# प्रकरण दुसरे

# 'बारोमास' मधील समाजचित्रण

- प्रस्तावना
- समाजचित्रण
- पुढील समाजचित्रण काही मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करू

  १. ग्रामीण जीवनातील अपुऱ्या सुख-सुविधा

  २. नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक

  ३. ग्रामीण व शहरी जीवन यांची तुलना

  ४. शहरातील सुख-सुविधांचे असणारे प्रचंड आकर्षण

  ५. शहरी जीवनाच्या आकर्षणातून ग्रामीण युवकाला येणारे अपयश

  ६. शहरी मुलींची मानसिकता

  ७. ग्रामीण तरुणांची तयार झालेली मानसिकता

  ८. कादंबरीतील शेतकरी व त्यांची उत्पादने

  ९. लेखकाचे ग्रामीण जीवनाशी असणारे संबंध
- समारोप
- संदर्भग्रंथ

प्रकरण दुसरे

# 'बारोमास' मधील समाजचित्रण

## प्रस्तावना

सदर प्रकरणात आपण सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या ग्रामीण कादंबरीतील समाजचित्रणाचा अभ्यास करणार आहोत. ही कादंबरी म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनातील व्यथा, वेदनांचे कठोर वास्तव प्रकट करणारी कलाकृती आहे. मागील दोन दशकांत वाढत्या यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या जीवनाची जी त्रेधातिरपिट उडाली आहे; त्याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. जागतिकीकरणाचे परिणाम, नोकरी समस्या, गुप्तधनाचा शोध, तलाठ्यांचा भ्रष्टाचार, ग्रामीण जाणिवा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नव्या अर्थव्यवस्थेनुसार शेतीची होणारी दुरवस्था, सुशिक्षित तरुणांच्या करूण कहाण्यांचे उत्तम चित्रण या कादंबरीत आलेले आहे. ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात आधुनिकीकरणामुळे आजपर्यंत अनेक बदल झाले. अनेक लेखकांनी आपापल्या पद्धतीने ते साहित्यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र जागतिकीकरणाची चाहूल लागलेल्या शेतकऱ्यांच्या जीवनावरील कथा, कादंबऱ्या खूपच कमी प्रमाणात वाचकासमोर आल्या म्हणूनच तर सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही कादंबरी मराठी ग्रामीण साहित्यात आपला वेगळा ठसा उमटविते.

## समाजचित्रण

ह. ना. आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो' (१८९०) ही कलाकृती वाचकांच्यासमोर अवतरली. तेव्हा वाचकांना काहीतरी वेगळे मनाला अस्वस्थ करणारे असे लेखन वाचीत आहोत, याची जाणीव झाली. कादंबरी म्हणजे काय? या संबंधीचा एक वेगळाच महत्त्वपूर्ण अनुभव मराठी वाचकांना आपटे यांच्या सान्निध्यात मिळू लागला. आतापर्यंत केवळ एक करमणुकीचे व वाचकांना

बोध देण्याचे साधन म्हणून कार्यरत असणारी कलाकृती आपली करमणूक वा बोध साधणारी राहिली नसून; थोडेफार शाश्वत स्वरूपाचे मूल्य आहे, समाजचित्रण हा तिचा मुख्य विषय आहे, समाजातील वेगवेगळ्या घटना-प्रसंगाचा विचार त्यात समाविष्ट होऊ शकतो; हे त्या साहित्यिकांनी व कादंबऱ्यांनी दाखवून दिले. या संदर्भात विलास सारंग लिहितात, ''समाजचित्रण म्हणजे एका अर्थी बाह्य, वस्तूगत विश्वाचे चित्रण म्हणता येईल. व्यक्तीचा इतरांबरोबर, इतर व्यक्तींबरोबर, वस्तूंबरोबर येणारा संबंध चित्रित करीत असतो. व्यक्तीच्या दृष्टीने इतर व्यक्ती या वस्तुमानच असतात. तेव्हा त्यादृष्टीने 'वस्तुगत' हा शब्द योग्य म्हणता येईल. पुन्हा निर्जीव वस्तूंनाही कादंबरीत महत्त्व असते. सर्वसाधारणपणे कादंबऱ्यांमध्ये वस्तूचा, स्थळाचा निर्देश मुबलक असतो.''[१] तरी अशा कादंबऱ्या आजच्या ग्रामीण परिवर्तनाच्या वास्तवाचे कलात्मक चित्रण करणाऱ्या ठरतात. आजची आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निश्चितच आहे असे म्हणता येईल.

१९६० नंतर मराठी साहित्यात ज्या नवीन कादंबऱ्या आल्या त्यांची जाणीव नवीनच होती. काहींचे स्वागत झाले तर काहींवर टीकाही झाली. पण सदानंद देशमुख यांची 'बारोमास' मात्र एक वेगळी कलाकृती ठरते. याचा पाठपुरावा म्हणजे त्यांना नुकताच पद्मश्री विठ्ठल विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त १३ वा विखे पाटील साहित्य पुरस्कार देण्यात आला. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण साहित्य संपदेत एक मोलाची भर घातली आहे. 'बारोमास' वाचत असताना कोठेच ओढाताण केल्याची जाणीव होत नाही. अतिशय सहज अशा ओघात या कादंबरीचे लेखन झाले आहे. कादंबरीची सुरुवात करताना लेखक लिहितात, ''कल्याणीच्या मळ्यात उतरलेली सांज भलतीच व्याकूळ, केविलवाणी वाटत होती. ही उदास सांज मनातून सगळ्या शरीरात पाझरत गेली आणि त्यामुळेच आपण असे जडशीळ झालो आहोत, असं एकनाथला वाटलं.''[२] अशा सहज भाषाशैलीत कादंबरीची सुरुवात होते. प्रत्येक व्यक्तिरेखा व आशय अतिशय वास्तव वाटतो. शेतकऱ्यांची दु:खं

योग्य प्रकारे चित्रित करण्यात त्यांना योग्य दिशा मिळाली आहे. म्हणून देशमुख 'बारोमास' लिहिण्यात यशस्वी झाले आहेत.

## पुढील समाजचित्रण काही मुद्यांच्या आधारे स्पष्ट करू

प्रा. सदानंद देशमुख हे धगधगत्या ग्रामीण समाजाचे भेदक चित्रण करणारे अलिकडच्या काळातील कादंबरीकार आहेत. अनेक बेकारांचे दारिद्र्य, अडचणीत सापडलेला समाज, समाजाला करावा लागणारा संघर्ष, त्या संघर्षातून येणारे अपयश, यासारख्या गोष्टींवर अतिशय निर्भिडपणे लेखन करून त्यांनी समाजदर्शन घडविले आहे.

### १. ग्रामीण जीवनातील अपुऱ्या सुख-सुविधा

आपणास असे दिसून येते की, पूर्वी ग्रामीण जीवनातील लोकांच्या गरजा या किमान होत्या. आज त्या कमाल झाल्या आहेत. शहरी संस्कृतीचा प्रभाव पडत असून ग्रामीण लोकांचे शहरी जीवनाशी संबंध वाढत आहेत. म्हणून त्यांच्या गरजा वाढत आहेत. मात्र काही गरजा त्यांच्या प्रामुख्याने रास्तच आहेत., 'आरोग्य हेच माणसाचे सर्वस्व आहे.' त्याच्यावरच संपूर्ण माणूस अवलंबून असतो. मात्र ग्रामीण भागात आरोग्याकडे काहीवेळा दुर्लक्ष केले जाते. ग्रामीण भागात चांगले वैद्य व सर्व सोईनीयुक्त अशी वैद्यकीय सेवा नसते. त्यांना इतर ठिकाणी जावे लागते म्हणून काही वेळा रुग्ण रुग्णालयात पोहोचण्याआधीच मृत्यू पावतो. यासाठी ग्रामीण भागात वैद्य आणि वैद्यकीय सेवा असावी. त्याचबरोबर आरोग्य चांगले राहण्यासाठी स्वच्छ पाणी मिळणे आवश्यक आहे. सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे असणे आवश्यक असते. पण ग्रामीण भागातील गटारे मातीने भरलेली असतात. ही महत्त्वाची ग्रामीण समस्या आहे. ग्रामीण भागात विद्युत पुरवठ्याचाही लपंडाव चालूच असतो. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. ग्रामीण भागात आणखीन एक

14458
A

महत्त्वाची समस्या असते, ती म्हणजे शौचालयाची, 'बारोमास' या कादंबरीत ही समस्या जाणवते. गावात सार्वजनिक व वैयक्तिक शौचालय असणे देखील गरजेचे असते.

ग्रामीण भागातील लोकांना आठवडीबाजार देखील गावात असणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांना जवळच्या गावात नाहीतर तालुक्याला जावे लागते. तालुक्याला जाण्यासाठी पक्के रस्ते असणे गरजेचे आहे. पण काही ठिकाणी ग्रामीण भागात अजूनही पक्के रस्ते नाहीत. त्यामुळे अनेक अडचणी या लोकांना सोसाव्या लागतात. अनेक भागात दळणवळणाची साधणे उपलब्ध नसतात. त्यामुळे अनेक ठिकाणी पायी चालत जावे लागते. काही ठिकाणी बससेवा असते. पण ती बस येईलच याची खात्री नसते. बेभरवशाचा हा एस. टी. महामंडळाचा खेळ ग्रामीण लोकांची कशी छळवणूक करतो ते फक्त ग्रामीण भागातच पहावयास मिळते. म्हणून गावात येणाऱ्या बस वेळेत याव्यात ही मागणी ग्रामीण लोकांची असते. बस सेवेबरोबरच टपाल सेवाही गावात असणे आवश्यक आहे.

आज ग्रामीण भागातील लोकांच्यांही सुख-सुविधा वाढताना दिसतात. ग्रामीण भागातील लोकांना आज विविध ठिकाणी संपर्क साधण्यासाठी दूरध्वनीची आवश्यकता भासू लागली आहे. तर थेट बाहेरील देशात काय चालले आहे? कोठे काय घडत आहे? त्याचा परिणाम काय होतोय? याची माहिती मिळण्यासाठी त्यांना आकाशवाणी, दूरदर्शन यांची गरज भासू लागली आहे. तर मनोरंजनासाठी ही त्याचा वापर आज ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात होतो आहे. हे दर्शविण्यासाठी लेखक लिहितात, ''अरे एकनाथ, टी. व्ही. चालू करणं घटकाभर, मनरंजन तरी करतो. टी. व्ही. तल्या त्या गोऱ्यागोमट्या बाया, साबनानं आंगुळ करणाऱ्या, थुईथुई नाचणाऱ्या. एक दिवस पाह्यल्या नाई की करमत नाई. इसमल्यासारखं वाटते. अन् एकदा त्याह्यचं दर्शन झालं की दिवसभर करमते.''[३] हा चंगळवाद ग्रामीण भागात सुरू झाल्याने आपोआपच त्यांच्या गरजा वाढू लागल्या

आहेत. राहण्यासाठी चांगले घर असावे, घरात गॅस सिलेंडर असावा म्हणजे धुरात बसावे लागणार नाही. या ग्रामीण स्त्रियांच्या मागण्या असल्या, तरी तालुक्याला जाण्यासाठी मोटरसायकल असावी, म्हणजे वेळेत जाऊन येते, ही ग्रामीण भागातील पुरुषांची मागणी वाढत आहे.

ग्रामीण जीवन जगत असताना तेथील लोकांना अनेक संघर्ष करावे लागतात. माशांच्या पिलांना पोहायला शिकवावं लागत नाही. ते गुण त्यांच्यात उपजतच असतात. तसे ग्रामीण भागातील मुलांना संघर्ष करायला शिकवावे लागत नाही, ते परंपरेने चालूच असते. त्यामुळे ती मुलं संघर्षाला सुरुवात करतात., अशा संघर्षमय संसारात जर शहरी वळणात वाढलेली अलकासारखी मुलगी विवाहानंतर राहण्यास आली तर लवकर तिथे रुळणार नाही. कारण शहरी भागातील सर्वच सुविधा तिला ग्रामीण भागात मिळणार नाहीत. त्यामुळे तिची मानसिकता कशी होते आणि तिला कोणत्या अडचणीला सामोरे जावे लागते. याविषयी लेखक लिहितात, ''खूप हाल सहन करावं लागतात इथं. घरात गॅस नाही. बिया काढलेल्या सूर्यफुलावर नाही तर तुराट्यावर धुरात वेटाळून स्वयंपाक करावा लागतो. घरात फरशी नाही. गायी, म्हशीच्या शेणाचा शेणकाला करून हे गोठ्यासारखं घर तिसऱ्या दिवशी सारवावं लागतं. नरकवास आहे नुसता. अन् माणसंही तसेच गावंढळ. वेडपट...''[४] अशा गोष्टीला तिला सामोरे जावे लागते. म्हणजेच तिच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळते. रंगविलेल्या स्वप्नाचा, ग्रामीण भागात गेल्यावर स्त्रीमनाचा कसा चुराडा होतो. हेच कटू वास्तव 'बारोमास' या कादंबरीत आले आहे.

## २. नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक :

ग्रामीण भागात आज अनेक नवशिक्षित युवक आपणास बेकार फिरताना दिसतात. त्यांनी घेतलेले शिक्षणच असे आहे की, ते फारसे काही करू शकत नाहीत. जे करता येते तिथे अनेक तरुणांची मोठी गर्दी असते. सर्वांनाच नोकऱ्या मिळू शकत नाहीत. जे नोकरी ऐवजी शेती अथवा

BARR. BALASAHEB ... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY ...

इतर व्यवसाय करू इच्छितात त्यांनाही फारसे यश मिळत नाही. पारंपरिक व्यवसाय बुडाल्याने आधुनिकीकरणाचा शिरकाव झाल्याने हा नवशिक्षित युवक अक्षरश: रस्त्यावर आला आहे. त्याला काही करून जगले पाहिजे. त्याच्याच जबाबदारीवर घरची काही मंडळी असतील तर त्यांनाही जगविले पाहिजे. या अशा अडचणीत हा नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक सापडला आहे.

नवशिक्षित युवक हा असल्या जीवघेण्या प्रसंगात सापडला असल्याने तो अनेक व्यसनाच्या आहारी जाऊ लागला आहे. कोणत्याही मार्गाने पैसा मिळविणे हे त्यांचे ध्येय बनले आहे. म्हणून तो वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करू लागला आहे. आजच्या घडीला मोठमोठ्या बँकावर जे दरोडे पडतात, ठिकठिकाणी चोऱ्या होतात. वाटमाऱ्या होतात, हे आपण पाहतो. तेव्हा आपणास या गुन्हेगारांचे वय २०-३० च्या दरम्यान असल्याचे दिसते. दारिद्र्यामुळे हे तरुण गुन्हेगारीकडे वळलेले दिसतात. काही करून पैसे मिळवायचे, डोनेशन द्यावयाचे व नोकरी मिळवायची या इराद्यामुळे अनेक युवकांना वेगवेगळ्या कल्पना सुचतात व त्यातूनच 'बारोमास'मधील सोनेरी टोळीचा उदय होतो.

शिक्षण घेऊनही नोकरी न मिळाल्याने ग्रामीण भागातील अनेक युवक शहरातून परत खेड्यात आले आहेत. कितीही शिक्षण घेतले तरी नोकरी मिळेलच याची खात्री नाही. कादंबरीतील एका एकनाथचीच ही अशी अवस्था असून, ग्रामीण भागाचा जर आपण विचार केला तर अनेक एकनाथ आपणाला भेटतील. कादंबरीकाराने 'एकनाथ' हे ग्रामीण मनाचे प्रातिनिधिक चित्र साकारले आहे. अशा अनेक युवकांची ही स्थिती मनाला सुन्न करणारी आहे. शिक्षण घेऊनही नोकरी नाही आणि गावात जाऊन शेती करावी तर पाणी नाही. अशा अडचणीत सापडलेल्या युवकाला समाजात कसे राहावे, कसे बोलावे हा देखील प्रश्न पडतो. यासंदर्भात लेखक लिहितात, "आपला तर काही मेळच राहिला नाही. आपण विचार करतो आपल्या एम्. ए. च्या भाषेत अन् गावात, शेतात, घरात

बोलतो ग्रामीण भाषेत. आपल्यासारखा शिकलेला भेटला तर शिकलेल्या भाषेत. आपण म्हणजे पाणी. जसा संग तसा रंग! भोगी तशी रात आपली. भोगी तशी रात....''[५] अशा विचित्र परिस्थितीत या ग्रामीण युवकाला जीवन कंठावे लागते आहे.

आज अनेक संकटे युवकांच्यासमोर उभी राहताना दिसतात. त्यातूनही जगण्याची त्यांची धडपड कौतुकास्पदच आहे. घेतलेल्या शिक्षणातून नोकरी मिळत नाही. म्हणून तो कोणत्याही प्रकारची हलकी-सलकी कामे नाईलाजाने करतो. त्यावेळेस तो आपले शिक्षण व त्यांचा दर्जा यांचा विचार कधी मनात आणतच नाही. आपण शिक्षण घेतले आहे. हेच तो विसरतो आणि कामाला लागतो. हे दर्शविण्यासाठी लेखक लिहितात, ''आठवी-नववी शिकलेल्या नवरदेव-नवरीच्या वरातीपुढे राज्यशास्त्रात एम.ए. ला प्रथम श्रेणी मिळवणारा दिनकर दाभाडे, तोंडाचा चंबू करून बिगुल किंवा सनई वाजवताना दिसतो, तेव्हा वरातीवर बॉम्बस्फोट करावा असं वाटतं. हा आपला देश, ही आपली समाजव्यवस्था. ही आपल्या शिक्षणाची कदर!''[६] अशा शब्दात लेखक नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक काय करतो, याचे चित्रण आपल्या कादंबरीतून करतो. लेखकाची बंडखोर मानसिकता दिसून येते या कादंबरीत अनेक प्रकारचे चित्रण हे समाजचित्रण म्हणूनच प्रामुख्याने पुढे येते. ते चित्रण कादंबरीपुरते मर्यादित न राहता त्यात संपूर्ण समाजाचाही विचार केला जातो.

शिक्षण आणि नोकरी या दोन्हीच्यामध्ये सापडलेल्या युवकाला येणाऱ्या अनंत अडचणी व प्रश्न, यांच्यावर या कलाकृतीत विचार झाला आहे. शासनाचे नियम सारखे बदलत जातात. यात कोणाचा फायदा होतो तर कोणाचा तोटा होतो. सुरुवातीला यु. जी. सी. ने सेटचा नियम आणला. पण नंतर मात्र नियमात बदल करून काहींना कायमस्वरूपी केले ते लोक आज आरामात आहेत तर दुसरीकडे त्यांच्याबरोबरच शिकलेले तरुण मात्र जगण्यालाही मुश्कील झाले आहेत. .त्यांचे चित्रण

लेखकाने समाजचित्रण करताना योग्य पद्धतीने केले आहे. म्हणून नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक वेगवेगळ्या ठिकाणी कसा अपयशी ठरतो. याचे यथार्थ दर्शन या कलाकृतीतून घडते.

## ३. ग्रामीण व शहरी जीवन यांची तुलना

वरील मुद्यांचे विवेचन करताना, आपणास ग्राम व शहर यांची तुलना प्रकर्षाने जाणवते. ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान व शहरी भागातील लोकांच्या राहणीमानामध्ये फरक जाणवतो म्हणूनच आपणास तुलना करता येते. ग्रामीण भागातील तरुण शिक्षण घेऊन कितीही मोठा झाला तरी त्याला त्याच्या ग्रामीण भागाविषयी आवड असते. तो ग्रामीण भाग, आपले गाव विसरू शकत नाही. तेथील माती, मातीचा गंध या गोष्टी त्याला प्रिय वाटतात. आजचा ग्रामीण तरुण हा शिक्षण घेऊन पुढे आल्याने त्याला योग्य आणि अयोग्य या गोष्टीतील तुलना निश्चितपणे जाणवते. ग्रामीण भागात जीवन जगणाऱ्या लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. तर शहरी भागात जीवन जगणाऱ्या लोकांना काही सोईंची पूर्तता असते. त्यामुळे त्यांना फारसा त्रास होत नाही. शिक्षण घेण्यासाठी 'बारोमास' मधील एकनाथ मोहाडीला येतो व तेथील शैक्षणिक वातावरणात तो शिक्षण घेतो. शिक्षण घेत असताना तेथील निसर्गरम्य वातावरणात त्याला काही गोष्टी आवडू लागतात. तेव्हाच तो आपल्या गावाची आणि शहराची तुलना करू लागतो.

ग्रामीण भागात रहाण्यापेक्षा आपण मोहाडीतच राहावे असे एकनाथला वाटते. तो तेथील उंच झाडे, निसर्ग याच्या सहवासात रमून जातो. तर उलट आपले गाव त्याला ओसाड, भयाण वाटायला लागते. एवढेच नाही तर आपली पत्नी ही ग्रामीण भागातील असण्यापेक्षा शहरी वातावरणातीलच असावी असे वाटायला लागते म्हणून तो ग्रामीण भागात राहणाऱ्या बळीमामाच्या मुक्ताशी विवाह न करता, शहरी वातावरणात शिकलेल्या अलकाशी विवाह करतो.

एकनाथला वाटते शिकलेली मुलगी आपल्या भावना समजून घेईल. अशिक्षित मुलीशी आपली वैचारिक पातळी जुळणार नाही. शिकलेली पत्नी मिळाली तर मुलांना शिकलेली आई मिळेल. ती मुलांना चांगले वळण लावील. पण अशिक्षित मुलीशी विवाह केला तर आपणालाच जास्त त्रास होईल. म्हणून शहरी व ग्रामीण मुलींची तुलना करून शहरात राहणाऱ्या अलकालाच अधिक महत्त्व देऊन तो तिच्याशी विवाह करतो.

विवाह झाल्यानंतर अलका सांजोळात येते, तेव्हा मात्र तिला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कारण ग्रामीण भागात शहरी भागासारख्या कोणत्याच सुख-सुविधा उपलब्ध नसतात. अनेक अडचणी तिथे असतात. ग्रामीण व शहरी भागाची तुलना करताना लेखक लिहितो, ''मोहाडीसारख्या सुखवस्तू शहरात नोकरी करणाऱ्या बापाच्या घरात ती वाढली. तिथं सगळ पॉश. घर पॉश; बाहेर निघालं तर रस्ते पॉश. अन् इथं सांजोळात सगळं भकास. गावात सतत धूळ उडत राहते. घरात धूळ, दारात धूळ. माणसांच्या मनातही धूळ. तिची अवस्था पाहिली की राग येत नाही. कीव येते. तिला साजेसं इथं काहीच नाही. खाणं नाही, पिणं नाही. लेणं नाही. बोलणं नाही. आपण मध्यंतरी बरे बोलायचो. पण आता गावात राहून शुद्ध बोलायला जावं तर आसपासचे नावं ठेवतात. म्हणतात-कुठं नवकरी हाये. शुद्ध बोलाय लागलात. आमच्यावाणी वावरातच त राबतू. मग आपणही तसंच बोलतो. तसेच विचार करतो. तसेच राहतो. इस्त्रीचे कपडे घालून कुठं कोळपं हाणायला जाता येते का?''[७] सुशिक्षित ग्रामीण मनाचा आणि विचारांचा कोंडमारा होताना दिसतो. एकंदरीत अशी तुलना ग्रामीण आणि शहरी जीवनात करता येते.

शहरी भागात विविध सुविधा असतात. तर ग्रामीण भागात त्या सुविधा नसतात. शहरी भागातील टी. व्ही. वर इंग्रजी गाण्याचा धांगडधिंगा चालू असतो. तर ग्रामीण भागात दूरदर्शनवर

मराठी वाहिन्याचे कार्यक्रम चालू असतात. हा फरक जाणवतो. एकनाथ मोहाडीला गेला असता, तिथे त्याला शहर विरुद्ध खेडे कसे असू शकते याचा अनुभव येतो याविषयी लेखक लिहितो,

''खेड्यातल्या लोकांना काहीच मॅनर्स नसतात. कोणाच्या खोलीत केव्हा जावं, हेही कळत नाही. खेडवळ ते खेडवळच.

असे शब्द चादरीतून स्पष्टपणे ऐकायला आले. आणि तो गलितगात्र झाला. पलंगावर पडून तळमळत राहिला. जयाचे तेच शब्द कानात. शहर विरुद्ध खेडे.

शहर : नागरी, सुसंस्कृत

खेडे : गावंढळ, खेडवळ. जया: शहरात; एकनाथ : खेड्यात. जया पूर्वीही म्हणायची, म्हणजे काही करायचं झालं तर-शहर आहे हे तुम्हाला सुचणार नाही.''[८] असे म्हणून ती एकनाथची हेटाळणी करायची. आपल्या परिचयाचा, इंडिया विरुद्ध भारत हा लढा या कलाकृतीत जया : इंडिया व एकनाथ भारत यांच्या माध्यमातून आला आहे. अशा पद्धतीने लेखकानी विविध पातळीवर ग्रामीण विरुद्ध शहर ही तुलना दाखवली आहे. यामध्ये अनेक गोष्टीचा समावेश त्यानी करून 'बारोमास'च्या माध्यमातून दाखवले आहे. अशा वेगवेगळ्या टप्प्यावर ग्रामीण व शहरी जीवनातील मूल्यांची, चाली, रीतिरिवाज, रूढी, परंपरा आणि एकूणच माणसांचीही तुलना करता येते.

## ४. शहरातील सुख-सुविधांचे असणारे प्रचंड आकर्षण

आज एकविसाव्या शतकात जर आपण लोकांच्या आवडी निवडी पाहिल्या तर प्रामुख्याने शहरातील सुख-सुविधाचे प्रचंड आकर्षण जाणवते. अनेक ग्रामीण जीवनात राहणाऱ्या श्रीमंतापासून ते कनिष्ठापर्यंत सर्वांना शहरी भागाचे आकर्षण आहे. कारण अनेक लोकांना माहित आहे की आपणास इथे ग्रामीण भागात फारसे काही मिळत नाही. पण शहरी भागात गेलो तर उपाशी मरत नाही. याची जाणीव अनेक ग्रामीणांना आहे. या संदर्भात भास्कर भोळे लिहितात, ''इंग्रजी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राजवटीत खेडीपाडी उद्ध्वस्त झाली. ग्रामीण कारागीर बेकार झाले. त्यांना खेड्यातून परागंदा व्हावे लागले. याचे गांधीना सर्वात जास्त दु:ख होते. ब्रिटिश भांडवलशाहीने इथल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडले होते. 'खेड्याकडे चला' ही गांधीवादी चळवळीची मुख्य घोषणा होती.''[९] त्याचे आज नेमके उलटे होत आहे. आणि ग्रामीण माणूस शहरी भागाकडे आकर्षला जात आहे. त्यांची कारणे ही वेगळी आहेत.

शहरी सुख-सुविधाचे प्रचंड आकर्षण जाणवत असतानाच, शहरात जीवन जगलेली अलका जेव्हा मोहाडीहून सांजोळला राहायला येते तेव्हा ती म्हणते, 'ह्या खेड्यात आयुष्य घालायचं नाही मला त्या धूळभरल्या घरात!' तिचंही बरोबरच आहे. कारण बरेच वर्षे शहरात राहिल्यानंतर शिक्षण घेतल्यानंतर तिला अशा या शेणामातीच्या घरात राहण्यास नक्कीच आवडणार नाही. म्हणून तिच्याही काही अपेक्षा असणारच, त्या रास्तच म्हणाव्या लागतात. कारण ग्रामीण भागातील मुलंही काही दिवसासाठी शहरात येतात. तेव्हा त्यांना शहरांचे प्रचंड आकर्षण जाणावायला लागते. तर अलकाचे जीवनच शहरात गेल्याने तिला शहराचे आकर्षण वाटणे आणि त्या पद्धतीने जीवन जगावे वाटणे स्वाभाविक आहे. यासंदर्भात लेखक लिहितो. ''तिचं सुख म्हणजे सगळ्या भौतिक साधनांचा उपभोग... दोघाचं घर. फ्रिज, टी. व्ही, कुलर, सोफा, दागिने, भरपूर कपडे. भरपूर किराणा... तिचं म्हणणं असं असते की त्याच्यासाठीच जन्म.''[१०] अशा गोष्टीचे आकर्षण अलकाला असते आणि त्या पद्धतीने ती जीवन जगण्याचा प्रयत्न करताना दिसते.

शहरी भागातील लोकांची राहणीमान, त्यांच्या घरातील नीट नेटकेपणा घरातील विविध वस्तूंची व्यवस्थित मांडणी. या सर्व गोष्टी ग्रामीण भागातील लोकांना आकर्षित करतात. शहरी लोकांची भाषाही अनुकरण करायला लागतात, तरीही फरक जाणवतोच, तो असा की, शहरी

भागातील लोक जेवण करतात तर ग्रामीण भागातील लोक भाकरी खातात. अशी तुलना लेखक दाखवतो.

तसेच ग्रामीण भागात आजही संयुक्त कुटुंबपद्धती आपणास दिसते. मोठमोठी कुटुंबे एकत्र राहताना दिसतात. त्यामुळे बऱ्याच वेळा नवीन माणसाला त्यांचे नातेसंबंध लक्षात येत नाहीत. एवढी मोठी कुटुंबे ग्रामीण भागात आहेत. पण आज हळूहळू शहरी जीवनाचे आक्रमण ग्रामीण परिसरातही होताना दिसते. म्हणून 'कुटुंब किती लहान तेवढे सुख महान' हा नारा सर्वत्र ऐकवला गेल्याने त्याचा नेमका चुकीचा अर्थ घेऊन लोक संयुक्त कुटुंबात राहण्याऐवजी वेगवेगळी घरे थाटू लागले आहेत. ही मूळ संकल्पना शहरातूनच आली आहे. आणि अनेक मोठमोठी कुटुंबे आज ग्रामीण भागात तुकडे तुकडे होताना दिसतात. एकत्र कुटुंब पद्धतीचे फायदे अनेक असले तरीही लोकांना पटत नाही. त्यांना विभक्त कुटुंबातील सुखसुविधा सारख्या त्यांच्या डोळ्यासमोर दिसत असतात. या संदर्भात लेखक लिहितात, ''अजूनही संधी गेली नाही. वाटण्या करून घ्या. आपल्या वाटणीची जमीन विका. मोहाडीत जाऊन राहू. नाही नोकरी मिळाली तर कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट चालवू. प्रेस सुरू करू किंवा झेरॉक्स, एस. टी. डी. बूथ... बाबांच्या एवढ्या ओळखी आहेत, त्या ओळखीचा फायदा होईलच. तुम्ही फक्त मनाची तयारी करा...''[११] अशा पद्धतीने अलका आपल्या पतीला सल्ला देते. यातून अलकाची मानसिकता आणि शहराची ओढ व्यक्त होते. ग्रामीण भागात आज अशा अनेक अलका आपणाला भेटतील. नवऱ्याला शहराकडे चला म्हणून सांगणाऱ्या, अशा अनेक घटना प्रसंगाच्या साह्याने कादंबरी पुढे सरकते.

## ५. शहरी जीवनाच्या आकर्षणातून ग्रामीण युवकाला येणारे अपयश

'बारोमास' ही ग्रामीण कादंबरी वाचत असताना असे वाटते की, ग्रामीण भागात वाढलेला एकनाथ व शहरी वळणात वाढलेली अलका यांच्या वैवाहिक जीवनाचे चित्रण कादंबरीत आले

असेल. त्यांच्या संसाराचे यश-अपयश कादंबरीत कधी भावनिक तर कधी सौम्य पातळीवर उमटले असेल असे वाटते. पण लेखकानी त्या विषयाला खूपच कमी पृष्ठे खर्च केली आहेत. या ३४९ पृष्ठाच्या कादंबरीत अलकाची व्यक्तिरेखा जेमतेम १६३ पृष्ठापर्यंतच आली आहे. तिथून पुढे एकदा अलका रिक्षातून जाताना एकनाथला दिसते. यापेक्षा वेगळे काही चित्रण पुढे येत नाही. म्हणजेच अलकाचे चित्रणही या संपूर्ण कादंबरीत येऊ शकत नाही. अर्ध्यावरच थांबते. म्हणजेच शहरी जीवनाच्या आकर्षणातून जरी एकनाथने अलकाशी विवाह केला असला तरी ती त्याला आयुष्यभर साथ देऊ शकत नाही. याचा अर्थच असा की, त्याला अपयश आले आहे असे दिसते.

शहरी भागातील अनेक सुखी कुटुंबे एकनाथने पाहिली आहेत. आपणही त्यांच्यासारखे राहावे असे त्याला मनोमनी वाटत असले तरी प्रत्यक्ष मात्र वेगळीच वस्तुस्थिती त्याच्यासमोर उभी राहते. एकनाथच्या घरात सरपण नसते. भाजीला काही नसते. खायचे तेल नसते. घरात कोणत्याच वस्तूचा पत्ता नसतो. म्हणून त्याने जरी आपले जीवन शहरी पद्धतीने जगण्याचा विचार केला असला तरी तो त्या पद्धतीने जगू शकत नाही. कारण त्याला अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या निर्माण होतात. शहरीजीवनाच्या आकर्षणापोटीच तो आपल्या मामाच्या मुलीशी विवाह न करता अलकाशी करतो. पण अलका शेतात काम करू शकत नाही. म्हणून 'दिसायला देखणी अन् कामाला पोकळ फुकणी' असे चित्रण तिच्याबाबत लेखक कादंबरीत करतात.

अलका ही मुळातच शहरी असल्याने तिच्या माहेरी मोहाडीत कुलरच्या हवेत झोपण्याची सवय असते. सांजोळात मात्र माडीत उकाड्यात झोपावे लागायचे. ते पण अंगावरचे डास-चिलट मारत. पण बऱ्याच वेळा अलका तो त्रास सहन करत झोपत असते. एकनाथ तिच्याजवळ जातो आणि तो कसा अपयशी ठरतो, यासंदर्भात लेखक लिहितात, ''तो हळुवार असा अलकाच्या पलंगावर झोपला. तिच्या अंगावर हात फिरवू लागला. तर अंगात वीज शिरावी तशा चपळाईने ती

उठली. अन् आपल्या देहाशी झोंबणाऱ्या नवऱ्याला तिने अंगातलं सारं बळ एकटवून जोरात ढकलून दिलं. तो बेसावध आणि रोमँटिक अवस्थेत होता. असं काही होईल याची त्याने कल्पनाच केली नव्हती. त्यामुळे तिने जोरात लोटल्याबरोबर तो धाडकन खाली पडला. दणक्याने आधीच खिळखिळी झालेली माडी चारी अंगाने हादरून गेली.''[१२] आणि एकनाथच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली.

पुढील काळात अलका बदलत गेली. सारखी ती माहेरी मोहाडीला जाऊ लागली. तसे एकनाथचा संसार अस्थिर होऊ लागला. म्हणजेच त्याला अपयश येऊ लागले. शहरी जीवन जगण्याचे त्याचे स्वप्न सत्यात उतरू शकले नाही. स्वप्न हे मृगजळासारखे पुढे पुढेच चालले व तो दिवसेंदिवस अस्वस्थ होत गेला.

शहरी वातावरणाच्या आकर्षणातून अपयश आल्यानंतर मात्र एकनाथ वेगवेगळे विचार करू लागला. त्याच्या डोक्यात अनेक विचार घोंगावू लागले. या संदर्भात लेखक लिहितो, ''झोपताना आणि उठताना त्याच्या मनात असाही विचार यायचा की आपण आपली अर्धी हयात हे विश्व सोडून दुसऱ्या विश्वात जाण्यासाठी खर्ची घातली. शिकलो, सावरलो. पण नोकरीचं ते मोहमायी मृगजळ पुढे पुढेच पळत गेलं. पळूनच गेलं; ते काही आपल्या हाती येत नाही. मग त्याला वाटायचं सगळ्या नोकरशाहीचे पगार सरकारने एकदम कमी करावे. आपण तिकडे पाहून का झुरतो? केवळ पैशासाठी, झकपक राहण्यासाठी, चकपक खाण्यासाठी, भौतिक सुखाची लयलूट करण्यासाठी. आपला हव्यास थोडा थोडा विझू लागतो तर अलका त्याला भडकावून देते. फायदा काहीच नाही. तीही जळते. आपणही जळतो. असं हे जळणं किती दिवस? मनाला सुखावणारा गारवा कधी मिळायचा? मग त्याच्या मनावर पश्चात्तापाचा विळखा कराकचून आवळला जायचा...''[१३] अशा

अनेक आघाड्यावर पावला पावलाला एकनाथला अपयश येत गेले. आणि शहरी जीवनाच्या आकर्षणातून तो अक्षरश: हतबल झाला. हेच लेखकाने दाखवले आहे.

## ६. शहरी मुलींची मानसिकता

प्रत्येक शहरी मुलींना शहरातच राहण्यास आवडते. तर त्याला अलका तरी कशी अपवाद ठरणार? ती पण शहरी जीवनाशी एकरूप झाली असल्याने तिला ग्रामीण भागात राहणे पसंत पडणारच नाही. एखाद्या वेळेस ग्रामीण माणूस शहरी भागात राहू शकतो. पण शहरी माणूस ग्रामीण भागामध्ये राहू शकत नाही. त्यामुळे अलका विवाह झाल्यावर सांजोळात येते. तेव्हा तिला अनेक अडचणी जाणवायला लागतात. कारण विवाहाच्या अगोदर आपणास ग्रामीण भागात राहावे लागेल. असा ती कधी विचारच केलेली नसते. विवाह झाल्यानंतर आपणास चांगला नोकरदार पती मिळेल. आपण त्यांच्याबरोबर शहरातच राहणार. ही तिची मानसिकता असते. ही मानसिकता एका अलकाची नसून अनेक शहरी मुलींची आहे.

सांजोळात अलकाचा संसार एकनाथच्या बरोबरीने सुरू होतो. तेव्हा तेथील अनेक अडचणी तिच्यासमोर उभ्या राहतात. तेथील राहणीमान, बसणे, उठणे, खाणे-पिणे, भाषा या सर्व गोष्टीत खूपच तफावत तिला वाटायला लागते. आणि तिची मानसिकता बदलायला लागते. तिथेच कोठेतरी ती ठरवून टाकते की, आपण जास्त काळ इथे राहू शकत नाही. ती जेव्हा घरात स्वयंपाक करायला जाते. तेव्हा घरात गॅस तर नसतोच, पण चुलीत घालायला सरपण पण नसते. अशा वेळेस ती एकनाथला म्हणते, आपल्या पत्नीकडे, घरातील गोष्टीकडे लक्ष द्यायला जमत नसेल तर लग्न तर कशासाठी केले. त्यापेक्षा मलाच सोडून द्या. असे विचार ती आपल्या पतीला सुचविते. याविषयी लेखक लिहितो, ''तुमचं सगळं बरोबरच होतं. चूक आमचीच झाली. उतावीळ होऊन तुमच्याशी लग्न जुळवलं. बाबा म्हणायचे संबंध चुकवायचा नाही. एम. ए. बी. एड्. आहे. लागेलच नोकरी.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पण तेव्हा काय माहीत हा एम. ए. बी. एड् एवढा मूर्ख असेल... म्हटलं, आपल्याला बी. एड. करता आलं नाही. म्हणून बरा आहे नोकरीवाला नवरा. पण तेव्हा काय माहीत की नशिबात धूळमातीच राहणार आहे म्हणून...''[१४]

अलकाची मानसिकता अशा प्रकारची निर्माण होते. आणि तिला सर्वच ग्रामीण परिसर अंगावर धावून आल्यासारखा वाटू लागतो. विवाहपूर्वी रंगविलेल्या स्वप्नांना एका पाठोपाठ एक असे धक्के बसत जातात. तिची मनाची मानसिकता नकारात्मक सुरू होते. तिला कोणत्याही गोष्टीत आवड निर्माण होत नाही. कोणत्याही कामात रस राहत नाही. ती दिवसेंदिवस खचत जाते. मानसिकतेबरोबरच तिची शारीरिक स्थिती पण ढासळू लागते.

पती हा आपल्या सुख-दु:खात सहभागी होतो की नाही; याचा ती विचार करत नाही. शिवाय त्याला ती स्वीकारत नाही यासंबंधी लेखक लिहितात, ''लाज नाही वाटत जवळ यायला. शरीराचे चोचले पुरवायला, वासना जिरवायला बायको पाहिजे. अन् तिच्या मनाचा काही विचार नाही. कोणत्या अवस्थेत जगते मी या कैदखान्यात माझं मलाच माहीत. स्वत: तर शंभर रुपयाची वस्तू घेऊन देत नाही. बापाने बांगड्या दिल्या लग्नात. त्यांच्यावरही डोळे ठेवतात मेले. वावराच्या लागवडीसाठी बांगड्या विकायच्या म्हणते ती महाराणी... अन् तूही ऐकून घेतू. नेभळट, हलकट... पलंगावर यायची लाज कशी वाटत नाही. माणसानं असावं. पण एवढंही बेशरम नसावं...''[१५] असे ती आपल्या नवऱ्याला सुनावते.

आज समाजातील अनेक ग्रामीण तरुण शहरी भागातील मुलींशी विवाह करून सुखी राहण्याची स्वप्ने पाहात असतात. अशावेळी कशा अडचणी येतात यांचा अभ्यास करून लेखकाने या कलाकृतीत त्या यशस्वीपणे मांडल्या आहेत. हे आपणास स्पष्टपणे जाणवते.

## ७. ग्रामीण तरुणांची तयार झालेली मानसिकता

ग्रामीण तरुणांचेच प्रतिनिधित्व एकनाथ करतो आहे. संपूर्ण कादंबरी वाचल्यानंतर असे लक्षात येते की, कादंबरीतील नायक एकनाथ हा विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय कुटुंबातील अनेक तरुणांचे प्रतिनिधित्व करतो आहे. शिक्षण, नोकरी, डोनेशन, सेट या सर्व गोष्टी आज समाजातील अनेक तरुणांच्या मुख्य समस्या बनल्या आहेत. कादंबरीतील मधु असो वा दिलीप पवार हे समाजातील विविध व्यक्तिरेखा आहेत. समाजातील तरुणांच्या समस्या लेखकाने 'बारोमास' या कादंबरीच्या माध्यमातून मांडल्या आहेत.

आजच्या ग्रामीण तरुणांपुढे अनेक प्रश्न आहेत. तरीपण एक महत्त्वाचा प्रश्न पडतो. 'ग्रामीण तरुण मना तू अस्वस्थ का होत नाहीस? तुझ्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा का फोडत नाहीस? तू असेच किती दिवस जीवन जगणार आहेस? लाखातले, कोट्यतले भ्रष्टाचार आज अब्जात सुरू झाले. मंत्र्यांचे दौरे लाखो रुपयाचा चुराडा करू लागले. एक राष्ट्रीय नेता येतो. पन्नास हजार लोक गोळा करतो. जाहीर सभा घेतो. पन्नास हजार लोकांचे पाच तासाप्रमाणे हिशोब केला तर, दोन कोटी पन्नास हजार तास निष्फळ जातात, तर हे राष्ट्रीय नेते देशाला काय देणार आहेत? ते काहीच करू शकत नाहीत.

राजकीय नेते घोषणा करतात, 'देश सुधारला पाहिजे, शिक्षकांनी विद्यार्थी घडविला पाहिजे' पण ते तरुणासाठी मात्र काहीच करत नाहीत. म्हणून तरुणांनी होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढले पाहिजे. हीच मानसिकता आज ग्रामीण तरुणांच्यात तयार झाली पाहिजे. यासंदर्भात लेखक लिहितो, ''आम्ही तुमच्या मतदारसंघातले तुमचे कार्यकर्ते. तुमच्या प्रचाराच्या वेळी आम्ही गल्लोगल्ली भटकत असतो. तुम्ही निवडून आले की आम्ही तुमच्या मिरवणुकीत उड्या मारून पाय

मोडेस्तोर नाचत असतो. तुम्ही आमचे लोकप्रतिनिधी. आमच्या तक्रारी तुम्हाला नाही तर मग कोणाला सांगणार साहेब...''[१६] हीच मानसिकता या कादंबरीत अनेक तरुणांची आहे.

या कादंबरीत नायक एकनाथ याची मानसिकता यापेक्षा वेगळी काय असणार आहे. तो पण एक शिक्षण घेऊन बेकार झालेला तरुण. नोकरी नाही, धंदा नाही. करता येण्यासारख भरपूर आहे, पण काहीच आपणास करता येत नाही. अशा या अवस्थेत जगणाऱ्या एकनाथची मानसिकता दाखविताना लेखक लिहितात, ''जुने पुस्तक. एम. ए. चा अभ्यास करताना विकत घेतलेले. लीळाचरित्र, दृष्टान्तपाठ, ज्ञानेश्वरी अध्याय नववा. मर्ढेकरांची कविता, केशवसुत, बालकवी! अजून भिंतीला ठोकलेल्या खुंट्यावरच्या पाटीवर. धूळ साचलेले. तेच ते किती दिवस वाचायचे... डोक्यात ठासून भरले म्हणून एम. ए. फर्स्टक्लास झालो. पण डोक्यातून ते रिचवायचे कुठे? आता कोणाला शिकवायचं? वावरातल्या झाडांना, की दगडांना?''[१७] असे अनेक विचार एकनाथच्या डोक्यात सारखे येताना दिसतात.

एकनाथचा भाऊ मधु हा कादंबरीत नकारार्थी भूमिकेत वावरताना आपणास दिसतो. तोही शिक्षण घेऊन बेकारच आहे. म्हणून नोकरीसाठी अनेक ठिकाणी प्रयत्न करताना दिसतो. सुरेश साठेला नोकरी मिळवून देण्यासाठी पैसेही देतो. आज कालच्या नोकऱ्या या कशा पद्धतीने मिळतात हे सांगण्यासाठी लेखक लिहितात, ''इंटरव्ह्यूच्या दिवशी नोकऱ्या फिट होत असतात का आजकाल? गेला त्यो जमाना. सम्दं आधीच जोडजाड करून ठेवा लागते. इंटरव्ह्यू म्हणजे एक ड्रामा आस्ते. कोणाकोणाला घ्यायचं ते आधीच ठरेल आस्ते.''[१८] अशा पद्धतीने आजच्या नोकऱ्या मिळतात व दिल्या जातात.

आज नोकरभरती ही शासनाची म्हणे डोकेदुखी आहे. पण शासकीय अधिकाऱ्याचा भ्रष्टाचारच आज शिष्टाचार होताना दिसतो आहे. आज शासनाचे एकही खातं शिल्लक नाही, की

तिथे भ्रष्टाचार चालत नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण तरुणांची परवडच होणार आहे. यात शंका नाही. म्हणून ग्रामीण तरुणांची तयार झालेली अशी मानसिकता या कादंबरीत अनेक ठिकाणी जाणवताना दिसते.

## ८. कादंबरीतील शेतकरी व त्याची उत्पादने

'बारामोस' या कलाकृतीत एकनाथ आणि अलका यांचे व्यक्तिचित्रण रेखाटत असतानाच लेखकानी शेतकरीवर्ग कशा पद्धतीने जीवन जगत असतो, त्यांच्या शेती उत्पादनांची बाजारात कोणत्या पद्धतीने विक्री होत असते. एकूणच शेतकऱ्यांसमोरील अनेक अडचणीचे वास्तव दर्शन घडविले आहे. शेतकऱ्यांची आजची अवस्था चित्रित करताना लेखक लिहितात, ''शेतीबाडी पिकत नाही. पिकली तरी मालाला किंमत नाही. पैसा डोळ्याने दिसत नाही. पैशावाचून भागत नाही. आपल्यासारखे शेतकऱ्यांचे पोर शिकलेले नव्हते, तोपर्यंत सारं ठीक होतं. कळते होईतो ढोरामागे... अन् कळते झाल्यावर औतामागे...''[११] अशी आज ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कुटुंबाची स्थिती आपणास दिसते.

शेतकऱ्यांच्या अनेक शत्रूमध्ये निसर्ग हा एक महत्त्वाचा शत्रू आहे. तो कधीच शेतकऱ्यांना साथ देत नाही. जेव्हा शेतकऱ्याला पावसाची गरज असते. तेव्हा पाऊस येत नाही. गरज नसते. तेव्हा पाऊस येतो. आलेल्या पिकांचे नासधूस करून टाकतो. म्हणजे निसर्गावर मात करून शेतीतून उत्पादन काढायचे म्हणजे मोठे आव्हानच असते. शिवाय दुसरा शत्रू म्हणजे आपल्या बाजारपेठा आणि तिसरा शत्रू. आपले आयात निर्यातीचे सरकारी धोरण या सर्वांमुळे शेतकरी हा दिवसेंदिवस रसातळाला चालला आहे. शेतकऱ्याला बरे दिवस येण्याची आज तरी कुठलीच चिन्हे दिसत नाहीत.

शेतकरी हा शिवरायांचा मावळा होता, आपली संपूर्ण शक्ती युद्धात खर्ची घालत होता. पण इंग्रजांचे आगमन झाल्यावर त्यांनी आपल्या तलवारी खाली ठेवल्या, आणि नांगर हाती धरला, या

समाजाला जगवले. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा ठरला. आज मात्र तो कणा मोडून शासन हळूहळू त्याचा खिळा करताना दिसत आहे.

आजचा शेतकरी आपला शेतमाल विकून, कर्ज फेडून राहिलेल्या पैशात बायकामुलांसाठी साधे कपडेही घेऊ शकत नाही. इतकी कठीण परिस्थिती आज शेतकऱ्यांवर आली आहे. यासंदर्भात लेखक लिहितात, ''कावून की आपलं उत्पन्न एकरी तीन हजार. काईबी पेरा. सरकार बरोबर एकरी तीन हजार देते. मूंग पेरा. किती व्हते? चांगल्या हंगामात एकरी तीन पोते. भाव हजार रुपये किंटल दाम तीन हजार. हाब्रीड पेरा. एकरी दहा पोते. भाव तीनशे रुपये. तीन हजार. कापूस पेरा. एकरी एक किंटल भाव दोन हजार. सोयाबिन पेरा. एकरी पाच पोते. भाव सहाशे रुपये. काईबी पेरा. सरकार एकरी तीन हजाराच्या वर जाऊ देत नाही. अन् ते तीन हजार काढायले एकरी खर्च येते आडीच हजार. उरतात पाचशे रुपये. पाचशे रुपयांत शेतकरी पोराले शहेरात ठेवून कोचिंग क्लास लावू शकते? इंजिनियर, डॉक्टर बनवू शकते? बायकोले नवं लुगडं आणू शकते? स्वोताले नवे कपडे शिवू शकते? आजारपाणी करू शकते? सणावाराले गोडधोड खाऊ शकते? काईच करू शकत नाही! म्हणून झुरत झुरत जगते. अन् झुरत झुरत मरते. अन् हे एकरी तीन हजाराचं त्याचं बजेटबी कवा जुळते. एकनाथ महाराजा. जवा पाऊस-पाणी बरोबर असंल, जवा रोगराई नसंल, नाईत मंग सम्दं टक्कल. पाणी लावून हजामत. सफाचट, वलितावाला आसंल त त्याची पाणी लावून हजामत व्हती अन् कोरडवाहू आसलं त त्याची बिनपाण्यानं हजाम व्हती.''[२०]

शेतकऱ्याला काहीच करता येत नाही. शेतकऱ्यांचे इतके दुर्दैव आहे की, त्याला कोणत्या वस्तू घ्यावयाच्या असतील तर इतरांच्या देणाऱ्यांच्या दारात त्याला जावे लागते. विनंती करावी लागते. पण त्याला जरी शेतीमाल विकायचा असेल तर व्यापाऱ्याच्या घरी अनेक वेळा जावे लागते. तेव्हा कधीतरी व्यापारी सकाळी येतो, दुपारी येतो असे सांगत दोन दिवसांनी येतो आणि कमीत कमी

भावाने तो माल खरेदी करतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला काडीचीही किंमत राहिलेली नाही.

एकदा मात्र बऱ्याच दिवसातून शेतकऱ्यांच्या मालाची किंमत वाढली होती. त्यासंदर्भात लेखक लिहितात, ''शेकडो वर्षात एकदाच फक्त कांद्याचे भाव वाल्ढेत त्याच्यापायी काय धुमाकूळ झाला. सरकार पल्डं. पण जास्त झाला त सरकार त्याचा काई मेळ लावत नाई. तुमाले सांगतो महाच अनुभव हाये. चार सालाआधी महामूर कांदा पिकला व्हता. त त्याचे भाव व्हते, आठाणे किलो मार्केटात नेला इकायले त भाडं तोडंबी निंगत नव्हतं. अन् जातीचा शेतकरी आसल्याच्यानं त्यो उखंड्यावर फेकायचाबी हरामीपणा व्हत नवता. म्हणूनच म्या कांदे भरून पोते सडकेच्या बाजून ठेवले. हेतू हा व्हता की लोकं फुकट नेतील. त हरामखोर माजोऱ्या लोकायनं कांदे फेकून दिले अन् वीस-पंचवीस रुपयाले पोतं इकते म्हणून चोरून नेले''[२१] असा हा शेतकऱ्यांच्या जीवनाचा खेळ आहे. तो खेळ शासन डोळे मिटून पहाते, व कानावर हात ठेवून ऐकते म्हणून शेतकरी हा अनेक येणाऱ्या अपयशामुळे अखेर आत्महत्या करतो आहे. त्यांच्या मरणाला कारणीभूत कोण? असा प्रश्न केला तर उत्तर 'शेती' असेच येते.

कोठे ही जावा सगळ्या शेतकऱ्यांची एकच अडचण शेती व्यवसाय तोट्यात. तो व्यवसाय सांभाळण्यासाठी त्याला व्याजाने पैसे काढावे लागतात. ते पण दहा टक्क्याने. फारच चणचण झाली तर शेवटी शेतीही विकावे लागते. कारण व्याजाने काढलेले पैसे परत द्यावे लागतात. दुनियेमध्ये अशी एकच गोष्ट आहे की, ती अजिबात थांबत नाही. रात असो, दिवस असो, थंडी असो, उन्ह असो, नाहीतर वारा असो. सर्व गोष्टी थांबतील पण ती गोष्ट अजिबात थांबत नाही. तिला आराम माहित नाही. अशी गोष्ट म्हणजे 'व्याज' या व्याजापाईच आज अनेक ग्रामीण भागातील शेतकरी भिकेकंगाल जीवन जगत आहेत. मात्र व्याजाने पैसे देणारा ऐश आरामात राहतो. वर्षे संपण्याच्या

आधीच येऊन आपले मुद्दल व्याज मागू लागतो. शेवटी मुद्दल राहू द्या. किमान व्याज तरी द्या असे तो म्हणत असतो. पण शेतकऱ्यांला प्रत्येकवर्षी त्याचे व्याजच देता येते. जेव्हा मुद्दल द्यावेच लागते तेव्हा त्याला त्याची शेती विकावी लागते. अन् दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

अशा दारिद्र्यात ग्रामीण भागातील शेतकरी जीवन जगताना आपणास दिसतात. कोठेतरी मनात एखादी आशा बाळगून असतात. जातील हे पण दिवस आणि येतील चांगले दिवस या आशेवर जगत असतात. अन् याच आशा माणसाला जगवत असतात. यासंदर्भात लेखक लिहितात, "चित्र पालटायचं काम आपून ज्याह्यले निवडूण देतो, ते सरकार करत आस्ते. पण आपल्या सरकारचं आसं धोरण हाये की शेतकरी सुखी नाई झाला पाह्यजे. समजा माल कमी झाला अन् दोन पैसे भाव शेतकऱ्याले जास्त मिळाय लागला की लोकं बोंबलतात. जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढले. मंग कनवाळू सरकार आयात करते. पुढारी लोकं मंग घोटाळे करतात. आपलं साधून घेतात पण माल जास्त झाल्यावर मंग त्याची निर्यात नाई करत. मगं सस्त्या भावात इकून शेतकऱ्याले आपली ठोकून घ्यावं लागते. अन् मी सांगतो जवरोक निर्यात व्हत नाई, तवरोक आपल्या देशातला शेतकरी सुखी व्हत नाई. म्हणूनच मले वाटते गॅट करार चांगले हाये"[२१] या आशेवर शेतकरी जीवन जगताना दिसतो. हिंमत धरून जगायचे, येणाऱ्या संकटाला सामोरे जायचे आणि पुन्हा पुन्हा ढासळणारा तोल सावरायचे हे काम शेतकऱ्यांचं नित्याचेच होऊन बसले आहे. बघू या येणारा काळच काय ते सांगणार आहे.

## ९. लेखकाचे ग्रामीण जीवनाशी असणारे संबंध

'तहान' व 'बारोमास' या दोन कलाकृती वाचल्यानंतर लेखकांचे ग्रामीण जीवनाशी असणारे संबंध स्पष्ट होतात. मुळातच ग्रामीण जीवनाची ओढ असल्याने त्या ओढीतून जे काही साहित्य निर्माण झाले ते अतिशय सकस असे आहे. ग्रामीण भागातील परिसराचे चित्रण करताना त्यांनी जे

तंत्र वापरले आहे ते महत्त्वाचे आहे. सरळ ग्रामीण परंपरेला शोभेल अशीच भाषाशैली, वास्तवाला साजेसं समाजचित्रण, लेखनातील परखडता, कादंबरीला मिळालेले कथानक या सर्व गोष्टीमुळे त्यांचे ग्रामीण जीवनाशी असणारे संबंधच दाखवित नाहीत तर कादंबरीला उंची प्राप्त करून देतात.

ग्रामीण जीवनातील अनेक व्यक्तिरेखांच्या साह्याने ही कलाकृती पुढे जाते. प्रत्येक व्यक्तिरेखा ही कोठेतरी वास्तवात आहे. त्यालाच त्यांनी साहित्यात उभे केले असावे असे वाटते. कादंबरीत ग्रामीण जीवनाशी संबंधीत अनेक प्रसंग येतात. मुळात कादंबरीच ग्रामीण असल्याने ग्रामीण जीवनातील जाणिवा, ग्रामीणाबद्दल असणारी ओढ या गोष्टी पुन्हा पुन्हा येतात.

ग्रामीण जाणिवांचे चित्रण करत असताना विविध पातळीवर या कलाकृतीतील आशय उलगडत जाते. एका सच्च्या ग्रामीण कादंबरीकाराचे ग्रामजीवनाशी किती जवळचे संबंध असू शकतात याची खात्री पटते. कारण या कलाकृतीतील अनेक लहानलहान प्रसंगांचे, घटनांचे चित्रण लेखक करताना दिसतात. ते लिहितात, 'शेतकऱ्याले कुठी बचत खाते आस्ते? गचत खाते आस्ते बुआ लयच लय...' अशा वाक्यावरून त्यांचे निश्चितच ग्रामीण जीवनाशी येणारे संबंध दिसतात.

या कादंबरीत प्रामुख्याने त्यांनी ग्रामीण भागाचे चित्रण करून ग्रामीण भागातील काही उपेक्षित गोष्टींना प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांच्या समस्या त्यांनी आपल्या कलाकृतीतून योग्य पद्धतीने मांडल्या आहेत. समस्या मांडताना कोठेही ओढाताण करण्याची जरुरी त्यांना भासली नाही. कारण कथानकाच्या विषयाचा आवाकाच एवढा मोठा आहे की, त्यांना ते सहज शक्य होत गेले. म्हणून त्यांनी 'बारोमास' या कादंबरीला मिळालेल्या कथानकाच्या आधारे ग्रामीण जीवनाचा, ग्रामीण जीवनातील अनेक गोष्टीचा उंचा पुरा आलेख वाचकांच्यासमोर उभा करण्यात यशस्वी झाले आहेत.

'बारोमास' या ग्रामीण कादंबरीत अनेक विषयांना आपल्या कवेत घेण्याचे सामर्थ्य आहे. ग्रामीण जाणिवांचा घेतलेला परामर्श इतका प्रचंड आहे की, कोणीही या कादंबरीला दाद देऊन जाईल. आज ग्रामीण कादंबरीच्या दालनात अनेक कादंबऱ्या आल्या. त्यांनी आपली छाप साहित्यपटलावर पाडली आहे. पण स्वातंत्र्योत्तर काळानंतर जो बदल झाला. त्याचे चित्रण अनेकांनी केले. पारंपरिक शेतीचा ऱ्हास, आधुनिक यंत्र युगाचे आगमन यासारखे विषय काही साहित्यिकांनी मांडले आहेत. आणि ते रास्तही आहे. मात्र शासनाच्या बदलत्या धोरणावर, समाजव्यवस्थेवर, बदलत्या निर्णयावर इतके कडवेपणाने फारसे कोणी लेखन केलेले नाही. ते करण्यात लेखक यशस्वी ठरले आहेत.

अनेकांच्या कादंबरीत ज्या मर्यादा पाळल्या गेल्या त्या मर्यादा इथे हळुवारपणे तोडण्याचा प्रयत्न झाला आहे. कोणत्याही प्रकारचा आड पडदा न ठेवता ग्रामीण जीवनातील अभावांचे चित्रण करण्यात आले आहे. ग्रामीण समाजातील कुटुंबव्यवस्था कोणत्या पद्धतीने कार्यरत असते. त्यांची अवस्था स्पष्ट करताना लेखक लिहितात, ''समाजव्यवस्थेच्या वर्तुळाचे पहिले आणि शेवटचे टोक कुटुंब असते. मूल्यभेदातून निर्माण होणारे ताणतणाव ही आजच्या कुटुंबाची जटील समस्या झाली आहे. समकालीन समाज वास्तव लेखनातून अभिव्यक्त करण्याचे व्रत घेतल्यानंतर मानवी मनाला वेढून असणाऱ्या चांगल्या वाईट गुणधर्माला कवेत घेणे हे कलाकृतीसाठी अपरिहार्य ठरते.''[२३] या कादंबरीत अनेक विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

## समारोप

ग्रामीण समाजातील अनेक कुटुंबे या कलाकृतीशी साम्य दर्शविणारी आहेत. सध्याच्या परिस्थितीतील ग्रामीण समाजाचा ढासळता बुरूज शब्दरूपात मांडण्याचा एक यशस्वी प्रयत्न झालेला आहे. खासकरून या कलाकृतीतील ग्रामीण बोलीभाषा लक्षवेधी ठरताना दिसते. आजचे

खरे ग्रामीण जीवन मराठी साहित्यात प्रकट होताना दिसत नाही. असा एक सूर मध्यंतरीच्या काळात ऐकवला जात होता. त्याला पुरेपुर उत्तर या 'बारोमास' कादंबरीतून मिळते आजचे वास्तव ग्रामीण जीवन आणि आजचे प्रश्न प्रस्तुत कादंबरीतून मांडल्याने बदलत्या काळाच्या सामाजिक स्तराची उकल कादंबरीकाराने अतिशय यशस्वीरित्या केलेली आहे यात शंका नाही.

## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | सारंग, विलास | अक्षराचा श्रमकेला, मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, २०००, पृष्ठ ३१. |
| २. | देशमुख, सदानंद | बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २००२, पृष्ठ १ |
| ३. | तत्रैव | पृष्ठ - ९७ |
| ४. | तत्रैव | पृष्ठ - ४५ |
| ५. | तत्रैव | पृष्ठ - १७ |
| ६. | तत्रैव | पृष्ठ - १०८ |
| ७. | तत्रैव | पृष्ठ - १५ |
| ८. | तत्रैव | पृष्ठ - ११८ |
| ९. | भोळे, भासकर लक्ष्मण | आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपूर, आवृत्ती दुसरी २००३, पृष्ठ - ४४४ |
| १०. | देशमुख सदानंद | बारामोस, कॉन्टिन्टल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २००२, पृष्ठ - १०३ |
| ११. | तत्रैव | पृष्ठ - १४२ |
| १२. | तत्रैव | पृष्ठ - १९ |
| १३. | तत्रैव | पृष्ठ - ९२ |
| १४. | तत्रैव | पृष्ठ - १५ |
| १५. | तत्रैव | पृष्ठ - २० |
| १६. | तत्रैव | पृष्ठ - २८७ |
| १७. | तत्रैव | पृष्ठ - १८ |
| १८. | तत्रैव | पृष्ठ - २४४ |
| १९. | तत्रैव | पृष्ठ - ५८ |
| २०. | तत्रैव | पृष्ठ - १८८ |
| २१. | तत्रैव | पृष्ठ - १८९ |
| २२. | तत्रैव | पृष्ठ - २७४ |
| २३. | तत्रैव | कटूसत्य |

# प्रकरण तिसरे

# 'बारोमास'मधील व्यक्तिरेखा

- प्रस्तावना
- 'बारोमास'मधील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा
  - १. एकनाथ
  - २. अलका
  - ३. नानू आजा
  - ४. सुभानराव
  - ५. शेवंतामाय
  - ६. मधु
- 'बारोमास'मधील दुय्यम व्यक्तिरेखा
  - १. सुरेश साठे
  - २. बनुबा महाराज
  - ३. दिलीप पवार
  - ४. दिनकर दाभाडे
  - ५. ममता वारे
  - ६. मुक्ता
  - ७. जया
  - ८. दगडू शेठ
  - ९. कांबळे तलाठी आणि बळीराम
- 'बारोमास'मधील इतर व्यक्तिरेखा
- समारोप
- संदर्भग्रंथ

## प्रकरण तिसरे

# 'बारोमास' मधील व्यक्तिरेखा

### प्रस्तावना

कादंबरी या वाङ्मयप्रकारात व्यक्तिरेखा महत्त्वाच्या असतात. व्यक्तिरेखांशिवाय कादंबरीचे कथानक आकाराला येऊ शकत नाही. म्हणून सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' या कादंबरीत काही व्यक्तिरेखा निर्माण केल्या आहेत. काही व्यक्तिरेखा प्रभावी आहेत तर काही दुय्यम स्वरूपाच्या आहेत. विविध स्तरातील, गटातील माणसाचे चित्रण करणे आणि ते यशस्वी करून दाखविणे हे कोणत्याही लेखकाला एक आव्हान असते. ते आव्हान देशमुख यांनी कितपत स्वीकारले आहे, त्यात ते कितपत यशस्वी झाले आहेत, हे त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ग्रामीण जीवनातील मानवी मनाचा खोल तळ शोधण्याचा सतत प्रयत्न त्यांनी आपल्या 'बारोमास' कादंबरीतून केला आहे. या कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या विशेषकरून विदर्भातील मध्यमवर्गीय आणि शेतकरी कुटुंबातील आहेत. या कादंबरीत देशमुख यांनी विविध अंगाने जीवन जगणाऱ्या व संघर्षमय व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. या कादंबरीत पुरुष व्यक्तिरेखा ७१ आणि स्त्री व्यक्तिरेखा २२ च्या दरम्यान असून एकूण व्यक्तिरेखा ९४ च्या जवळपास आहेत. कादंबरीचे संपूर्ण यशापयश कादंबरीतील इतर घटकांप्रमाणेच व्यक्तिरेखांवरही अवलंबून असते. कारण बहुसंख्य कादंबरीकार आपले विचार व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मांडताना दिसतात, यासाठी आपण 'बारोमास' या कादंबरीतील काही महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करणार आहेत.

## 'बारोमास' मधील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा

### १) एकनाथ

एकनाथ ही व्यक्तिरेखा कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा आहे. संपूर्ण कादंबरी याच व्यक्तिरेखेभोवती फिरताना आपणास दिसते. कादंबरीचा 'नायक' म्हणूनच एकनाथकडे पाहीले जाते. शिक्षण पूर्ण करून नोकरी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एकनाथला परिस्थिती साथ देत नाही. त्यामुळे त्याचे अंदाज चुकत जातात. शिक्षणाच्या व शहरीकरणाच्या आकर्षणातून तो अलकाशी विवाह करतो. पण ती त्याला साथ देत नाही. अलका या घरात अस्वस्थ असते. त्यामुळे एकनाथला कधीही अलकाचा राग येत नाही. उलट त्याला तिची कीवच येते.

ग्रामीण जीवनात वाढलेला पण शिक्षणाच्या निमित्ताने शहरी भागात राहिलेल्या एकनाथला अनेक अडचणी येतात. एवढे शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही. एम.ए.बी.एड. झाल्यावर कोठे तरी नोकरी मिळेल, या अपेक्षेने काही स्वप्ने रंगविली होती. शहरातील अलकाशी विवाह करून चांगल्या पद्धतीने जीवन जगावे असे त्याला वाटत असते. पण त्याचे स्वप्न केवळ मृगजळासारखे राहिले. शेजारी राहणाऱ्या ममता वारेचे सुधारित राहणीमान पाहून एकनाथला स्वत:ला संकोचल्यासारखे वाटते. पण तो काहीच करू शकत नाही.

अनेक वर्षे शिक्षणासाठी घालवून, पैसा खर्च करून, अभ्यास करूनही एकनाथला नोकरी मिळत नाही. आई आणि वडिलांनी घेतलेल्या कष्टाला फळ मिळत नाही. तेव्हा एकनाथच्या मनातील विचार व्यक्त करताना लेखक लिहितात, ''सगळं आठवते मा मले ! त्यानंच माह्या जिवाचा काला होते. तुहा अन् दादाचा किती रगडा होत होता माह्या, मध्याच्या शिक्षणासाठी दादानं सालभर एका कोपरीवर अन् एका धोतरजोडीवर राहावं. तू लुगड्याले लुगडे जोडून नेसावं. पण आम्हाले पॅन्ट-मनिले नवे घ्यावं. मीही रातरातभर जागलो. शानशोक टाळून पुस्तकाचे

डोंगरच्या डोंगर पचवले. पण सार्थक झालं नाही, त्याले मी तर काय करू? डोनेशनवाचून सगळी मेहनत पाण्यात गेली.''[१] असा प्रकार एकनाथच्या जीवनात घडला. त्याने आपल्या फाटत जाणाऱ्या संसाराला कितीही ठिगळे लावण्याचा प्रयत्न केला तरी ते कमीच पडत जाताना दिसते.

एकनाथच्या बरोबरच त्याची आईही या संसारात कशा पद्धतीने जीवन जगते आणि त्याबद्दल एकनाथला काय वाटते, याविषयी लेखक लिहितात, ''दोन जुन्या फाटक्या लुगड्यांचा फाटलेला भाग कापून धडक्या भागाला मध्ये सुईदोऱ्याने दांड मारून, जोडून त्याचे दोनरंगी एक लुगडे करून अंगावर नेसणे हा शेवंतामायचा आवडता छंद .... असे विचार मनात घोटाळत असतानाच त्याला पुन्हा आठवण झाली की, हरामखोरा, तू तिला प्रत्येक पगारावर नवे लुगडे घेऊन देण्याचे आश्वासन दिले होते. पण तरुणपणापासून तर म्हातारपणापर्यंत ती दिवसाआड दांडाचे लुगडे नेसत आहेच. हे म्हणजे तू तिचा मुलगा या नात्याने तुला जीव देता यावा एवढे सबळ कारण आहे. या विचाराने त्याच्यातला गहिवर दाट झाला.''[२] आणि तो एकटाच अस्वस्थ होत गेला. या वातावरणामुळे 'ग्रामीण आई' वाचकासमोर उभी रहाते की जी आजही अशाच धडुत्यांनी दारिद्र्यावर मात करते आहे.

घरातील वातावरण दिवसेंदिवस बिघडतच गेले. कोणकोणाचे ऐकायला तयार नसतात. अलका व मधु यांच्यात नेहमी वाद होत असतो. हाच वाद एक दिवस वाढतो व मधु अलकाला मारतो. तेव्हा एकनाथ मधुला विचारतो, तू माझ्या पत्नीला का मारलास, एवढी मस्ती कोठून आली?असे म्हणत तो मधुवर झेपावतो तेव्हा मधु व एकनाथ यांची झटापट होते. मधु त्याला म्हणतो, 'तू काय माझी मस्ती काढ तू सनकाडीछाप? माझी तुझ्यापेक्षा दीडपट बॉडी आहे' असे म्हणतो, तेव्हा त्यांच्यात कशी झटापट होते. याविषयी लेखक लिहितात. ''मधूने एकनाथला आपल्यातून बाजूला केलं आणि हात धरून गरगर फिरवत मग लोटून दिलं. तसा तो कोपऱ्यात

ठेवलेल्या टी.व्ही.वर बेसावध धाडकन कोसळला. त्याच्या जोरदार धक्क्याने टी.व्ही. खालचा बसका टेबल हेलकावला आणि टी.व्ही. खाली पोटावरच पडला. काच फुटून धडालऽऽ धूम असा आवाज झाला. सगळीकडे काचच काच झाले. टी.व्ही.च्या अंगातले काही अवयव तुटून इकडे-तिकडे झाले. दोघे झटोझोंबी करत असताना राजू, शेवंतामाय चित्रविचित्र आवाज काढत रडत पडत त्यांना आवरत होते. त्यामुळे एकच गलका झाला."[३] घरात अशा पद्धतीने भांडण झाल्याने घरातील वातावरण आणखीन बिघडत गेले.

अशा या नेहमीच्या भांडणांमुळे अलकाला या घरात एक क्षणभरही रहावे असे वाटत नाही. बारा महिने दारिद्रयात जगणाऱ्या या एकनाथच्या संसारात सडत राहण्यापेक्षा अलका आपल्या बापाच्या घरी जाऊन सुखाने राहणे पसंत करते. ती एकनाथला सोडून जाते. तेव्हा एकनाथचा निश्चितच पराभव होतो. तर अलका स्वत:चा निर्णय स्वत: घेऊन काहीतरी करून दाखविण्यासाठी सांजोळ सोडून अखेर मोहाडीला जाते. म्हणजेच लेखकाने या कादंबरीत एकनाथचा पराभव दाखविताना, अलकाचा विजय नोंदविला आहे आणि दोन मनांच्या आंदोलनाचे यशस्वी चित्रण केलेले आहे.

अशा प्रतिकूल परिस्थितीत आपली पत्नी आपणाला सोडून गेली आहे, आपण तिच्या कोणत्याच मागणीकडे लक्ष दिले नाही, आपण त्या मागण्या पूर्ण करू शकलो नाही, याचे एकनाथला वाईट वाटते. एकनाथ हा शिक्षण घेतलेला सुशिक्षित तरुण असतो. अलका माहेरी गेली म्हणून तो दु:ख करत बसत नाही. त्याला काही तरी नवीन करावे वाटते. गप्प राहावे असे त्याला कधीच वाटत नाही. तो शेवटी शेतकऱ्यांच्या मोर्चात सहभागी होतो. शेतकऱ्यांच्यासाठी सभा, भाषणे घेऊ लागतो. मोर्चे काढू लागतो, शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन करू लागतो. त्या आंदोलनाचा नेता होतो. भाषणे करून शेतकरी लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देतो.

आपण कसा संघर्ष केला पाहिजे; याची दिशा तो शेतकऱ्यांना देतो आणि सर्व शेतकरी त्याच्या नेतृत्वाखाली जमा होऊ लागतात. आज शेतकऱ्यांचे प्रश्न वाढत आहेत आणि त्या प्रश्नांची सोडवणूक जर करावयाची असेल तर शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांनी आंदोलने करणे गरजेचे आहे हा सूर लेखक एकनाथच्या रूपाने मांडतो.

एकनाथ आपले विचार शेतकऱ्यांसमोर मांडू लागतो. शेतकरीही त्याला प्रोत्साहन देऊ लागतात. याविषयी लेखक लिहितो,, ''या देशाचे दोन आधार आहेत. एक जवान, दुसरा किसान... एक देश जगवतो, एक देश राखतो, पण आपण पाहतो; आज शेतकरी पायदळी तुडवला जात आहे. नापिकी, व्याज, कर्ज यांच्या ओझ्याखाली तो दबून जात आहे. शेती करणारे दिवसेंदिवस गरीब होत आहेत. नुस्ते गरीब नाही. भिकारी होत आहेत. हात पुढं करून भीक मागणाऱ्या भिकाऱ्यात अन् शेतकऱ्यात आता काहीच फरक राह्यला नाई ... पण स्वार्थी व्यापारी, नोकरशाही, सरकार कोणाचंच शेतकऱ्यांकडे लक्ष नाही. उलटं सगळे त्याला गिळायला बसले आहेत. खेड्यापाड्यांत उद्योगधंदे नाहीत, त्यामुळे पैसा नाही. दारिद्र्य आपल्या पाचवीला पुजल्यासारखं आहे. आस्मानी सुलतानी संकटाने त्रस्त झालेला आपला शेतकरीबांधव आत्महत्या करीत आहे. तरी त्याच्या मरणावर रडणारं कोणी नाही. त्यांच्यावरचा अन्याय थांबलेला नाही. आणि समाज मुका-बहिरा-अंधळा झाला आहे.''[४] यासाठी आपणाला आता गप्प राहून चालणार नाही. अशा स्वरूपाचे भाषण एकनाथ शेतकरी बांधवाच्यासमोर करतो.

सर्व शेतकऱ्यांना अतिशय आनंद होतो. आपल्या शेतकरी संटनेला एक चांगला नेता मिळाल्याचे समाधान त्यांच्यात दिसू लागते. एकनाथचे भाषण झाल्यावर सर्व शेतकरी टाळ्याचा प्रचंड कडकडाट करून जय जवान, जय किसान ! शेतकरी संघटनेचा विजय असो ! अशा घोषणा

देऊ लागतात. एकनाथला गावोगावचे शेतकरी भेटू लागतात. शेतकरी संघटना कशी मजबूत होईल. याविषयी ते एकनाथशी चर्चा करू लागतात.

एकनाथची शेतकरी संघटना तीव्र स्वरूप धारण करते व रस्ता रोको आंदोलन सुरू होते. डांबरी रस्त्यावर एकनाथ पाच-दहा तरुण युवक घेऊन आडवा होतो. रस्ता बंद झाल्याने वाहने थांबू लागतात. तेव्हा पोलिस कारवाई होते. एकनाथला पकडून गाडीत घेऊन जातात. अखेर एकनाथचा संसार अलकाच्या जाण्याने, मधुच्या त्रासाने, आईच्या असहकार्यामुळे कसा कोसळत गेला, तसेच एकनाथच्या अटकेने शेतकरी संघटनाही विरत गेली. हे लेखकाने दाखविले आहे आणि या कादंबरीतील एकनाथ ही मुख्य व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. एकनाथचा झगडा एकनाथशीच आहे की काय असा एक नवा प्रश्नही अभ्यासकांच्या मनामध्ये निर्माण होतो कारण एकनाथ विषयी लेखक लिहितो, ''शेती असून शेतकरी नाही. शिक्षण असून कर्मचारी नाही. घर असून बेघर झालेले. भाऊ असून भाऊ नसल्यासारखे. शिक्षित असून अशिक्षित असल्यासारखे. बायको असून बायको नसल्यासारखे. गाव असून गाव नसल्यासारखे... एकाकी. एकटे... खऱ्या अर्थाने आपण एक-नाथ''[५]

## २) अलका

'बारोमास' या कादंबरीतील कथानक संघर्षमय जीवनाचा विषय आपल्यासमोर मांडताना दिसते. अलकाच्या संसाराचा प्रवास हा इथे चांगलाच वास्तवाच्या पातळीवरून चित्रित केलेला दिसतो. वास्तव प्रश्नांचे नेतृत्व करणारी अलका, एकाचवेळी मनस्वी संताप व्यक्त करणारी तर काही वेळा तडजोड करीत जगणारी, अशा स्वरूपात ती या कादंबरीत प्रतीत होते. तिच्या सर्व प्रयत्नांमागे एक भावनिक नाते असते. त्यामुळे तिच्या सर्व विचारांना तिच्या मानसिकतेचे अधिष्ठान प्राप्त झाले आहे. तिच्या भोवतालच्या विश्वाशी तिने निर्माण केलेले संबंध, तिच्या मानसिकतेने प्रेरित झालेले

दिसतात. त्यामुळे तिच्या वास्तव जीवनप्रश्नात सतत तिच्या मानसिकतेची प्रतिबिंबे मिळत रहातात. तिच्या कुटुंबातील सदस्यही तिच्या मानसिकतेवर परिणाम करीत असतात. त्यामुळे त्याचे परिणाम अलकाच्या मनोविश्वाला छेद देत राहतात. समाजातील एक माणूस ज्याप्रमाणे सर्वार्थाने दुसऱ्या कोणासारखा नसतो त्याचप्रमाणे या कलाकृतीतील अलका ही व्यक्तिरेखा सर्व बाबतीत इतरांच्यापेक्षा वेगळी आहे. म्हणून आपणास अलका या व्यक्तिरेखाची वृत्ती-प्रवृत्ती अभ्यासायची आहे.

अलका ही शहरी जीवनात वाढलेली एक सुशिक्षित स्त्री आहे. त्यामुळे तेथील सर्व संस्कार तिच्यावर झालेले आहेत. विवाहानंतर ती सांजोळसारख्या ग्रामीण भागात एकनाथच्या घरी येते. तेव्हा सुरुवातीला मात्र आपणास जास्त काळ इथे राहावे लागणार नाही असे तिला वाटते. कारण आपला पती एक सुशिक्षित एम.ए.बी.एड. शिक्षण घेतलेला आहे. त्याला कोठेतरी नोकरी मिळेलच अशा अपेक्षेवर ती जगत असते. आणि काही गोष्टीची तडजोड करते. पण पुढील काळात एकनाथला कोठेच नोकरी मिळत नाही. नोकरी मिळण्यासाठी डोनेशन द्यावे लागते. त्यासाठी पैसा नाही. शेत विकून पैसे देणे त्याला पटत नाही. म्हणून एकनाथ हा पैशाअभावी नोकरीपासून वंचित राहतो. आणि अलकाचे स्वप्न हळूहळू मावळू लागते. तेव्हा मात्र अलकाला पुढील काळ सहन होत नाही. मग ती बंड करू लागते.

ग्रामीण भागात फारशा काही सुखसुविधा उपलब्ध नसल्याने अलकाला स्वयंपाकही गॅसऐवजी चुलीवरच करावा लागतो. चुलीजवळच्या काळ्या पांढऱ्या धुराच्या वेटोळ्यात अलका गुरफटून जाते. फुकणीने फुंकून जाळ लावायचा आणि स्वयंपाक करायचा हे तिला त्रासाचे वाटू लागते. वडिलाच्या घरी ऐशआरामात जीवन जगणाऱ्या अलकाला अशा गोष्टीचा तिटकारा वाटू लागतो. तिचे मन कोठेतरी उचल खाते. एकनाथ आपल्याकडून होईल तेवढी अलकाला मदत करीत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

असतो. आपली पत्नी शहरी भागातील असल्याने तिच्याही काही अपेक्षा ह्या असणारच, या गोष्टीचा विचार करून तो तिला तिच्या अनेक कामात मदत करीत असतो. स्वयंपाक करायला सरपण नसते, तेव्हा एकनाथ अलकाला कशी मदत करतो याविषयीचे चित्रण करताना लेखक लिहितात, ''स्वयंपाक खोलीच्या टिनावर अर्धवट बाहेर आलेले दोन बांबू दिसले. हात वर करून उड्या मारून त्याने ते खाली ओढले./अन् बाहेर जाऊन गाडीच्या चाकाच्या आऱ्यात घालून ते काडकाड मोडले. वाळक्या बांबूचे तुकडे करून कवटा भरून चुलीजवळ आणून टाकले. त्यातले दोनतीन तुकडे आपल्या हातानं चुलीत घातले. चांगला जाळ फुंकून दिला. मग कासावीस झालेली अलका भगभग चेहऱ्यानी कोपरात पीठ मळू लागली. पण त्याच्याशी काही बोलली नाही. तिच्या डोळ्यातलं पाणी पिठात मळलं जाऊ लागलं.''[६] अशा पद्धतीने एकनाथ अलकाला मदत करीत असतो. तिला अधूनमधून समजून सांगत असतो. पण त्याचा फारसा उपयोग होत नाही.

एकनाथने कितीही मदत केली तरीही अलका त्याच्या संसारात राहण्यास असमर्थ ठरते. ती कामाचा जास्त त्रास झाला की अधूनमधून मोहाडीला जात असते. परत बोलवायला एकनाथ जातो हा प्रकार वारंवार चालू असतो. अलका व एकनाथ यांचा संसार हळूहळू अस्थिर होऊ लागतो. सांजोळसारख्या ग्रामीण भागात राहणे तिला जमत नाही. यामुळे अलकाचे तिचा पती, सासू, दीर यांच्याशी फारसे पटत नाही. यातून असे स्पष्ट होते की, अलका तिथे राहू शकत नाही. ग्रामीण भागातील लोकांना येणाऱ्या अडचणी, करावे लागणारे संघर्ष या सर्व गोष्टी अलकाला नवीन असतात. पण तेथील सर्व लोकांना ते अंगवळणी पडलेले असते. पण अलकाला त्या कशा सहन कराव्या, याचा फारसा अनुभव नसतो. म्हणून ती नेहमीप्रमाणे मोहाडीला जाण्यासाठी तयार होते. त्यावेळचा प्रसंग अधिक एकनाथ आणि अलका यांचा संवाद लेखक लिहितो, ''पलंगाखालची सुटकेस काढून तिने पलंगावर आदळली. तिच्या लग्नात आंदण भेटलेलं कपाट खाड् करून उघडलं.

आणि मग साड्यांचे, कपड्यांचे बोळे पलंगावर फेकले. नंतर त्यांच्या घड्या करून सुटकेस भरू लागली. तो हताशपणे पाहत होता. काही वेळाने त्याच्याच नकळत म्हणाला.

'काय तमाशा लावला हा?'

'तमशा करायला मी काय तमासगीर दिसते का?'

'मग ही भरसर कशासाठी सुरू केली?'

'तेवढंही समजत नाही का? सुशिक्षित आहात न तुम्ही?

'मोहाडीला जाते का काय?'

'काय करू इथं राहून. इथं राहिले तर बांगड्यांसाठी जीव घेतील तुमच्या घरातले

हैवान...''[७] असे संवाद त्या दोघात चालतात. यावरून आपल्या असे लक्षात येते की, या घरातील लोकांच्यावर अलकाचा विश्वास नाही. ते लोक आपला जीव घेतील ही भीती तिने व्यक्त केली आहे. किंबहुना स्त्रीयांच्या जीवनातील भूतकाळही तिच्या नरजेसमोर असावा म्हणून अलका या घरात जास्त काळ राहू शकत नाही हे सिद्ध होते.

एकंदरीत अलका या घरात सुखी नाही. अन् सुखाची अपेक्षाही करत नाही. कारण तिला संपूर्ण दु:खाचा डोंगर समोर दिसत असतो. या घरात दु:ख, दारिद्र्य याशिवाय दुसरे काहीच नाही. घरातील या नित्याच्या संघर्षातून अलका आपली सुटका करून घेण्याचे ठरविते. ती आपल्या माहेरी जाण्यासाठी तयार होते आणि हातात सुटकेस घेऊन अलका एकनाथसमोर येते. आणि त्याला सांगते. मी ह्या दळभद्री घरात पुन्हा पाय ठेवणार नाही. तुमचा माझा संबंध तुटला असे सांगून, एकनाथ ह्या घरात कसा अपयशी ठरतो ते सांगते. आपले तसे होऊ देणार नाही असे म्हणते. याविषयी लेखक लिहितो, ''माझा विकास करण्यासाठी, माझं सुख मिळविण्यासाठी मी समर्थ आहे. ही आपली शेवटची भेट. आपण पुन्हा आता कधीच, केव्हाच भेटणार नाही. हे आता सांगून

ठेवते.''[७] असे म्हणून ती या एकनाथच्या घरातून निघून जाते. ती कायमचीच परत न येण्यासाठी. तेव्हा एकनाथला अतिशय वाईट वाटते. तो दात ओठ खात ओरडतो. ते लेखक लिहितात, ''झाली आता सगळ्यायची थंडी? देली माही बायको काढून ... केला माह्या संसाराचा इच्चकडोणा...''[८] अशा पद्धतीने एकनाथच्या संसारातून अलका निघून जाते आणि दोघांच्याही संसाराची एक शोकांतिकाच होते. वाचकही विचार करायला लागतो.

एकनाथच्या दरिद्री संसारात त्याच्यासोबत राहून तो त्रास सहन न करता ती आपली जबाबदारी झटकून टाकते व आपल्या स्वत:च्या भल्यासाठी, काहीतरी करून दाखविण्यासाठी ती निघून जाते. एकंदरीत अलकाची व्यक्तिरेखा पुरेशी परिपक्व वाटत नाही. अलकाच्या सुखाच्या कल्पना शहरी संस्कृतीशी निगडीत असल्यानेच ती तडजोड करू शकली नाही. मात्र यातून अनेक ग्रामीण तरुणांना आपले जीवन जगण्यासाठी व घडविण्यसाठी एक प्रकारचा सूचक इशारा मिळतो.

### ३. नानू आजा

'बारोमास' या कादंबरीतील नानू आजा हा एकनाथचा आजोबा असून तो पारंपरिक पद्धतीने जीवन जगणारा माणूस आहे. तो बदलत्या काळाबरोबर बदलायला तयार नाही. शिवाय या बदलाला तो स्वीकारतही नाही. या कलाकृतीत एकही व्यक्तिरेखा दुसऱ्या व्यक्तिरेखासारखे जीवन जगताना आपणास दिसत नाही. प्रत्येक व्यक्तिरेखा आपापल्या परीने जीवन जगताना दिसते. या सर्व व्यक्तिरेखांवर लेखकाने आपला ताबा ठेवला आहे. कोणती व्यक्तिरेखा कोणत्या ठिकाणी किती परिणामकारक ठरते ते दाखविण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. म्हणून नानू आजा ही व्यक्तिरेखा कादंबरीच्या सुरुवातीसच योग्य पद्धतीने चित्रित झाली आहे.

नानू आजा वेगवेगळ्या पद्धतीने जीवन जगणारा माणूस होता. तो आपल्या निर्णयाशी ठाम असतो. शिवाय तो अंधश्रद्धाळू होता. त्याविषयी एकनाथच्या मनातील विचार लेखक लिहितात,

''खाद्यावर टिकाव टाकून, रानोमाळ भटकून वारुळ खोदणारा नानू आजा. आपण त्याच्या मागे. वारुळ खोदून त्याला चंदनशेष नागाचा शोध घ्यायचा होता. पांढरा शुभ्र, दुधासारख्या रंगाचा चंदनशेष नाग असतो. असं तो सांगायचा. चंदनशेष नाग दिसला की आपल्या घराण्याचा भाग्योदय होईल. आपल्या सात पिढ्या सुखात जगतील असं त्याला कुंभमेळ्यात एका तपस्व्याने सांगितलं होतं. म्हणून मग आपल्यालाही सोबत घेऊन जायचा, म्हणायचा, दिसला तर बरंच. माह्या संगतीनं तूबी लय मोठा माणूस व्हशील. पण चंदनशेष काही आजानाताला दिसला नाही. अलते भलते काळे, पिवळे, कबरे नाग निघायचे. नानू आजाला खूप राग यायचा. असा नाग दिसला की तो त्याची शेपटी धरायचा. नांगराची आगोल हाणताना आसूड गरगर फिरवावा तसा नाग डोईवर तीन-चार वेळा गरगर फिरवायचा आणि रापूकन भुईवर आदळायचा. केवढाही लांब आठ-दहा फुटी नाग असो, लोळागोळा होऊन जागच्या जागी खलास.''[१०] असा प्रकार नानू आजा करायचा. पण अखेरपर्यंत काही नानू आजाला तो चंदनशेष नाग दिसला नाही. त्याने त्याच्या शोधातच संपूर्ण जीवन घालवले.

नानू आजाने अस्सल ग्रामीण भागात जीवन व्यतीत केलेले असल्याने त्यांच्यावर सहजासहजी कोणाचीही मात्रा चालत नसे. तो आपल्या रूढी, परंपरेला चिटकून राहतो. आपली शेतीही आपणच करतो. त्याच पद्धतीने पुढील पिढीनेही करावे असे त्याला वाटत असते. नानू आजा आपल्या रानात संकरित बियाणं पेरू देत नाही. त्यामुळे त्यांचे उत्पन्न इतरांच्यापेक्षा कमी येते. म्हणून एकनाथच्या वडिलांनी नानू आजाचा विचार न करता आपल्या शेतात नवीन संकरित बियाणं पेरतात; तेव्हा मात्र नानू आजा भांडतो. पण त्याचे काहीच चालत नाही. पण तो स्वाभिमानी असल्याने आपल्या शेतात पेरलेले संकरित बियाणांचे पीक आल्यावर त्याची भाकरी खात नाही.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दिवसेंदिवस नानू आजा मनाने व शरीराने थकतो. कारण त्याची जेवणाची पंचाईत होते. त्याला इतर मंडळी सांगायचे. 'आसं करू नका' आता सर्वच जमाना असा हायब्रीडचा आला आहे. पण तो ऐकायला तयार नव्हता. पण नानू आजा म्हणायचा, "तुमी काई वाईट वाटून घेऊ नका. तुमचा तरी काय इलाज? जमानाच बदलला त्याले तुमी तरी कसं थोपवून धरचान? तसं आता माहं राह्यलंच काय म्हणा .... जगलो आस्तो. अजून दहा-बारा सालं. पण मरतो आता उपासमारीनं... पण तुमाले सांगतो. हे हाब्रीड तुमचंबी हाब्रीड करंल एक दिवस."[११] असा एक सूचक इशाराचं नानू आजा येणाऱ्या पिढीला देतात आणि ते आपल्या स्वत:च्या हातानी आपली समाधी मृत्यूपूर्वी चार महिने आधी तयार करून घेतात. कारण आपल्या मृत्युनंतर आपणाला कोठे जाळायचे, कोठे समाधी बांधायची, हा प्रश्न निर्माण होऊच नये. म्हणून कोण इथे बांधा, कोण तिथे बांधा असे म्हणायलाच नको. म्हणून तो आपल्या स्वत:च्याच हाताने कल्याणीच्या मळ्यात लिंबाजवळ आपली समाधी बांधून घेतो. कारण आपला आत्मा जरी घुटमळलाच तरी आपल्याला आपले शेत दिसावे ही त्याची इच्छा असते.

जिवंतपणी आपली समाधी बांधून घेतली म्हणून गावातले लोक त्याला हसू लागतात. सर्व गावात तो चर्चेचा विषय होतो. पंधरा-वीस दिवस खाटेवर लोळत पडलेला नानू आजा एक दिवस मृत्यू पावतो. अन् सारं गाव हळहळते. अशी एक छोटीच पण प्रभावी व्यक्तिरेखा लेखकाने या कलाकृतीत निर्माण करून ग्रामीण भागातील पारंपरिक पद्धतीने जीवन जगणारी मंडळी आपल्या जुन्या संस्कृतीला कशी घट्ट चिकटून आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४) सुभानराव

सुभानराव ही व्यक्तिरेखा या कादंबरीत नानू आजाच्या बरोबरीने येते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील कुटुंबप्रमुखाची जी अवस्था असते तीच अवस्था इथे सुभानरावांची झाली आहे. संपूर्ण

घरचा खर्च, मुलांचे शिक्षण या दोन्ही गोष्टीचा समतोल साधण्यासाठी अनेक कसरती त्यांना कराव्या लागतात. दोन्हीही मुलं शिक्षण घेऊन बेकार होतात. तेव्हा त्यांना खूपच वाईट वाटते. त्यांना सर्वच बाजूने संकटे समोर दिसायला लागतात. तेव्हा त्यांचे मत व्यक्त करताना लेखक लिहितो, ''आता कोणाले काय काय करू? इतक्या दिवस तुमच्या शिक्षेणापायी माइं पाठीले पोट चिकटलं. याले एमे बीएड केलं. तुले शेतकी शाळा शिकवली. पण झाला काई फायदा? आतात रातरातभर झोप येत नाई तुमच्यापायी मले.''[१२] अशी अवस्था सुभानरावांची होते.

एकनाथ जेव्हा घरची जबाबदारी स्वीकारतो तेव्हा मात्र सुभानराव जास्त विचार न करता होईल तेवढे काम करत असतो. सुभानराव नेहमी सारखे बाहेरून घराकडे येतात तर दारात त्यांची पत्नी शेवंतामाय रडताना दिसते. तिच्यासमोर त्यांचा नातू राजू असतो. सुभानरावांना वाटले. आपल्या लेकीच्या घरीच काय झाले की काय? असे वाटून ते घाबरतात. पण नातवाकडून सर्वजण ठीक असल्याचे समजते. तेव्हा ते आपल्या नातवाला विचारतात, मग ही का रडत आहे. तेव्हा नातू सांगतो. मामाला नोकरी लागली नाही म्हणून आजी रडते आहे. यावर सुभानराव चिडतात. तेव्हा त्यांची प्रतिक्रिया लेखक लिहितात, ''आवं काय येडचाळे लावले तुवा हे? ती गोष्ट का आता नवी नवाळीची राह्यली का? गंजून गेली आता ती. मी काय घायबरलो व्हतो. म्हन्लं कायच झालं आशीन इट्ठला... आता गंज गंज तुहा जीव तुटते पोरायच्या सुखासाठी. पण त्याह्यच्या नशिबात नाई त्याले आपून तरी काय करावं.''[१३] असे सांगून शेवंतामायला गप्प बसवितात.

सुभानराव ही एक वेगळी व्यक्तिरेखा या कादंबरीतून लेखकानी चित्रित करताना सुभानरावांना येणाऱ्या अडचणी ही सांगतात. मधुला आणि एकनाथला शिक्षण देऊन पुन्हा त्यांना नोकरीसाठी पैसा पुरविणे सुभानरावांना शक्य नसते; तेव्हा कल्याणीचा मळा दगडू महाकाळाला कराखरेदी करून द्यावयाचे व पैसे घ्यायचे हा विचार मधुचा असतो. तो तसे घरात बोलून

दाखवितो. तेव्हा सुभानरावांना घाम फुटतो. कारण ज्या शेतावर संपूर्ण कुटुंब जगत असते. तेच शेत मधु कराराखरेदी देतो. तेव्हा त्यांना खूपच त्रास होतो व सुभानराव अस्वस्थ होतात. मधु नोकरी लागल्यावर पैसा कसा कमविता येतो, सरपंचाला हाताशी धरून, भ्रष्टाचार करून पैसा कसा मिळविता येतो ते सांगू लागतो तेव्हा सुभानराव म्हणतात, 'हरामाची कमाई कुठी आंगी लागते का?' असे ते आपल्या मुलाला विचारतात.

मधु कल्याणीचा मळा दगडू महाकाळाला कराराखरेदी देऊन त्याच्याकडून दोन लाख रुपये घेतो. तेव्हा सुभानरावांना भलतेच रिकामे रिकामे वाटायला लागते. पंख तुटल्या पाखरासारखी त्यांची अवस्था होते. ते काहीच करू शकत नाहीत. अशा वेळेसच मधुला आमदार मालपाणी व त्याचा पी.ए. उत्तम ठोकरे यांच्याकडून फसविले जाते आणि एक लाखाला फटका बसतो. तेव्हा सुभानराव पूर्णपणे घाबरतात. काय करावे त्यांना सुचत नाही. ते थरथर कापू लागतात. बसल्या जागीच ते कलांडतात. घामाघूम होतात आणि यातून आपण आता कसे सुटणार म्हणू लागतात. आपल्याकडील एक लाख रुपये त्या दगडू शेठला दे आणि आपला अर्धा मळा तरी सोडवून घे, असे ते एकनाथला सांगतात, पण दगडू शेठ अर्धा मळा देण्यास तयार नसतो. तरीही सुभानराव त्यांच्याकडे जातात व अर्धा मळा मागतात. तेव्हा तो अर्धा मळा देत नाही. उलट सुभानरावांचा अपमान करतो. तेव्हा सुभानराव नाईलाजाने थरथरत्या पावलांनी घराकडे परत येतात.

सुभानरावांना आता अपयश पचविणे शक्य होत नाही. म्हणून ते घरातून त्यांची पत्नी शेवंतामायकडून शंभर रुपये घेऊन जातात व आत्महत्या करण्यासाठी किटकनाशक औषध पितात, पण वेळेतच लक्षात आल्याने ते वाचतात. पण ते अस्वस्थच राहतात. त्यांच्या अपेक्षा दोन्हीही मुलांकडून पूर्ण होत नाहीत. त्यांच्या दोघाही मुलांना नोकरी मिळत नाही. त्यामुळे ते खचत जातात. आणि त्यांनी मनात आणलेले विचार पक्के असल्याने ते पुन्हा घरातून बाहेर पडतात. घरातील व सर्व

बाहेरच्या माणसांना प्रश्न पडतो, हा सुभानराव गेलाच कुठे? प्रत्येकाला विचारले जाते. तुला कुठे दिसला का? पण प्रत्येकजण वेगवेगळी उत्तरे देतात. प्रत्येकजण शोधण्यासाठी तयारी करू लागतात. तेवढ्यात शेवंतामाय एकदम खाली कोसळली व म्हणाली, 'कुठी जायच्या आधी जांभुळखोऱ्यात जा' असे म्हणत ती रडू लागली. कारण तिला आठवतात, सुभानरावांचे ते शब्द, लेखक लिहितो, "तुम्ही कितीक दिवस ह्या शापातून वाचवणार हाये मला? आता बंदा डबा रिकामा करील नल्ड्यात. अन् आशा जागेवर जाईल की तिथं कुत्रंबी येणार नाई."[१४] असे म्हणाल्याने शेवंतामाय सर्वांना जांभुळखोऱ्यात जाण्यासाठी सांगते. म्हणून सर्वजण जांभुळखोऱ्याकडे जातात. शेवटी सुभानरावांचे काय झाले हा प्रश्न अनुत्तरीतच रहातो त्यामुळे वाचक विचार करायला लागतो.

अशा प्रकारे या कलाकृतीत सुभानराव या व्यक्तिरेखेच्या गायब होण्याबरोबरच ही अस्सल ग्रामीण कादंबरी लेखकाने जरी संपवली असली तरी सुज्ञ वाचकांना विचार करायला भाग पाडते.

## ५) शेवंतामाय

शेवंतामाय ही व्यक्तिरेखा या कादंबरीत स्त्री व्यक्तिरेखा म्हणून एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. रूढ अर्थाने एकनाथ या कादंबरीतील नायक आहे. पण त्याची पत्नी अलका मात्र या कादंबरीतील नायिका होऊ शकत नाही. कारण ती कादंबरीत पूर्णपणे चित्रित झालेली नाही. चित्रपटात जसे पाहुणे कलाकार येतात आणि जातात, त्याचप्रमाणे अलकाचे चित्रण या कलाकृतीत आले आहे. म्हणून आपणास प्रामुख्याने या कलाकृतीत शेवंतामाय या व्यक्तिरेखेलाच अधिक महत्त्व द्यावे लागते. कारण ती संपूर्ण कादंबरीत मध्यवर्ती भूमिकेत आपणास दिसते. सांजोळसारख्या ग्रामीण भागात आपला संसार ती जबाबदारीने सांभाळत असते.

आपली दोन्हीही मुले शिक्षण घेऊन घरीच आहेत याचे तिला वारंवार दु:ख वाटते. बऱ्याच वेळा ती बोलूनही दाखविते. आपला मुलगा एकनाथ एवढा शिकला पण त्याला नोकरी नाही म्हणून

ती अक्षरश: रडते. शेवंतामाय घरात एकटीच असताना घरातील संपूर्ण काम करते. कोणत्याच गोष्टीची कमतरता वाटत नाही. पण जेव्हा एकनाथ विवाह करून अलकाला घरी आणतो. तेव्हा मात्र ती घरात काहीच काम करत नाही. एकनाथने आपले ऐकले नाही हा राग तिच्या मनात सारखा येत असतो. ती आपल्या भावाची मुलगी मुक्ता हिला सून करून घेणार असते. पण तिचे शिक्षण कमी असल्याने एकनाथ तिच्याशी विवाह करत नाही. म्हणून ती अलकावर त्याचा राग नेहमी काढत असते.

अलका घरात असताना शेवंतामाय तिला कधीच घरकामात मदत करत नाही, शिवाय चांगलेही बोलत नाही. शेवंतामायच्या कुटुंबाला दिवसेंदिवस वाईटच दिवस येतात. तेव्हा तिला असे वाटते की, अलकाने दिलेला शापच खरा ठरतो की काय? म्हणून अलका माहेरी गेली तरीही शेवंतामाय तिला शिव्या देत असते. अलका घरात असते तेव्हा मात्र शेवंतामाय कोणतीच कामे करत नाही. इकडचा तांब्या तिकडे ठेवत नाही. फक्त दारात बसून राहते. रस्त्याने कोणी स्त्री-पुरुष जाताना दिसले की त्यांना बोलावणे, पान खायला देणे, अशा काही अनावश्यक गोष्टी ती करत असते. रिकाम्या चौकशी करण्यातच तिचा दिवसभरचा वेळ जातो. एकदाच एकनाथ तिला म्हणतो की, आई तू दिवसभर दारात यांच्याशी त्यांच्याशी बोलत बसतेस, त्यापेक्षा जरा अलकाला घरकामात मदत करत जा तर यावर लगेच शेवंतामाय आगीसारखे भडकून म्हणते, ''लय नेट पल्डा का रे तुह्या बायकोले? लगे नवऱ्याले मथवा लागली. अन् तूबी झाला दिडा दिवसात बायकोचा भाड्या. जिणं तुले पोट उपसून बाहीर काल्ढं नऊ मह्यण्याचं, त्या जन्मदातीवरच उलटला तू. म्हणगूत आहे की च्यूत पाहून भूत लागते ती काई खोटी नाई व बाई ... इतक्या दिवस म्या साऱ्या घराचा गाडा वल्ढा. तोंडावर पडस्तोर कामं केले. घरचे, वावरातले. तुमाले आर्ध्या राती उठू-उठू डबे करून देले शिक्षेणासाठी. तवा नाई मायची माया आली. तवा त लय टेक गाजवत व्हते

जन्मदातीवर ... मां, मले हे नाई आवडत. ते करून दे ... मीबी करून देत जाय ! दुसऱ्या दिवशी कालेजाले जावा लागे त आर्ध्या राती तुमचे कपडे धुवाजाय मी. आता तरी गडी शेणपाणी करते. तवा त शेणपाणी करा. दूधं काढा. भाकरी थापा. घरचा घणाणा आवरून पुन्ना वावरातबी जा. किती किती कामं व्हते वं माय मले ! माही कशी नाई कीव आली कोणाले?''[१५] असा प्रश्न ती एकनाथला विचारते. त्यामुळे तोही काही बोलू शकत नाही.

शेवंतामाय कुत्री व मांजर यांच्यावर प्रेम करताना दिसते, तर घरातील माणसांच्यावर प्रसंगी रागवताना दिसते. कुत्रीला कांगरीबया असे नाव ठेवते, तर चंद्री मांजराला जवळ करते. मंगळ्या वासरू हे तर ती कोठे जाईल तिथे जात असते. तसेच सोनेरी टोळीने आणलेली मूर्ती कळवंतीनीची आहे. तिच्या पायी राज्याचे राज्य गेले होते. ती मूर्ती परत तिथल्या तिथं ठेवून या असे सांगते. तर सुभानराव घरातून बाहेर पडल्यावर तो इकडे तिकडे कोठे गेला नसून जांभुळखोऱ्यातच गेला असणार अशी तिची खात्री होते, तेव्हा ती सर्वांना तिकडे जाण्यासाठी सांगते आणि ती मोठमोठ्याने रडू लागते. अशी ही व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीत चित्रित होताना दिसते. म्हणून ती महत्त्वाची आहे. मायलेकरांच्या मनाचे चढउतार कादंबरीमध्ये लेखकाने अतिशय भावस्पर्शी मांडलेले आहेत.

## ६) मधु

'बारोमास' या कादंबरीत मधु ही एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा लेखकानी निर्माण केली आहे. ग्रामीण भागातील घरात चालणारा संघर्ष दर्शविण्यासाठी या व्यक्तिरेखेची निर्मिती केली आहे. मधु हा कादंबरीचा नायक एकनाथ याचा लहान भाऊ आहे. तो सुशिक्षित आहे. त्याचे शिक्षणपूर्ण झाले आहे. पण त्याला कोठेच नोकरी मिळत नाही. म्हणून तो घरात बसून असतो. त्यामुळे घरातील लहान लहान घटना, प्रसंगाच्या निमित्ताने लेखकानी त्याला नकारार्थी भूमिकेत दाखविले आहे. पण

जेव्हा आपण त्या व्यक्तिरेखेचा अभ्यास करतो तेव्हा आपणास लक्षात येते की, अनेक घरातील अशा काही व्यक्तिंच्यावर प्रकाश टाकण्यासाठी ही व्यक्तिरेखा निर्माण केली आहे.

मधु हा स्वत: बेकार असल्याने तो गावातील आणखी काही मित्र गोळा करतो आणि एक सोनेरी टोळी तयार करून, गुप्तधनाचा शोध घ्यायला लागतो. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य एकत्र करून मांत्रिक बनुबाच्या सहाय्याने तो गुप्तधनाचा शोध घेत असतो. पण अखेरपर्यंत काही त्याला गुप्तधन सापडत नाही. त्याच्यासोबत गेलेला दिलीप पवार वेडा होतो. पण मधुला काही धन मिळत नाही आणि नोकरी पण लागत नाही. कारण त्याचा वशिला व पैसा कमी पडत होता.

एक दिवस मधुला सुरेश साठे भेटतो आणि तो आपल्या नोकरीबद्दल सांगतो. आपण कसे पैसे कमवितो, कोणकोणत्या परवानग्या देतो, याविषयी सर्व माहिती मधुला देतो. तेव्हा मधुलाही वाटते. आपणही पैसे भरून जॅक लावून नोकरीला लागलो असतो तर आपण ही पैसे कमविले असते पण तसे झालेले नसते. म्हणून तो विचार करू लागतो. तेव्हा सुरेश साठे त्याला सांगतो की, आता आपणास संधी आली की ती सोडायची नाही. माझ्या ओळखीचे बरेच लोक आहेत. फक्त पैसे तयार ठेव म्हणजे मी नोकरी लावून देईन, असे तो मधुला सांगतो. याविषयी लेखक लिहितो, ''तू पास झाला अन् तुले कॉल आला ऽऽ की तू मले भेट. बरोबर लग्गा लावून देतो तुपला. आपल्या थेट मंत्रालयालोक वळखी हायेत. आपल्या मव्हाडीचा आमदार हाये नं, त्याचा पी.ए. त आपला जानी दोस्त, बसत आस्तो न आम्ही आशेच संगमंग... कामाची गॅरंटी शंभर काय एकशे एक टक्का!''[६] अशी तो मधुला खात्री देतो. आणि फक्त कॉल आला की भेट असे सांगतो तेव्हा मधुला एक वेगळाच आनंद होतो.

एके दिवशी तो सुरेश साठेला घरी आणतो आणि आपल्या नोकरीचे निश्चित झाले आहे असे सांगतो. शिवाय ते सहजासहजी होणार नाही त्यासाठी दोन लाख रुपये द्यावे लागणार आहेत.

आणि तो पैसा गोळा करण्यासाठी आपण आपला कल्याणीचा मळा करारखरेदी करून द्यायचा असे तो घरात सांगतो. आणि तसे करतोही पण पुढील काळात सुरेश साठे व मालपाणी आमदाराचा पी.ए. मधुला नोकरी मिळवून देत नाहीत. नोकरी तर मिळतच नाही शिवाय कल्याणीचा मळाही जातो.

एकनाथ आणि दिनकर दाभाडे मोहाडीला जाऊन चौकशी करून येतात. काही उपयोग होत नाही. आमदाराचा संगळा वृत्तांत दिनकर सांगतो. मधुला फसवले गेल्याचे सिद्ध होते. मधु फसला गेल्याची बातमी अर्ध्या गावात झाली. याविषयी लेखक लिहितो, ''दुनिया लय बेकार निंगाली. देला एका लाखाले दणका...''[१७]

अशा पद्धतीने ग्रामीण परिसरात आज अनेक मधु आपणास भेटतात. ते कोणाकडून तरी फसविले जाते आहेत. नोकरी मिळत नाही. म्हणून नैराश्याने जीवन जगतात. अशा पद्धतीने जीवन जगणाऱ्या समाजातील काही तरुणांचे चित्रण लेखकानी मधुच्या व्यक्तिरेखातून साकार केलेले आहे. संपूर्ण कादंबरीत नकारार्थी भूमिकेत वावरणारा मधु अखेर फसलाच जातो. तो यशस्वी होऊ शकत नाही.

## 'बारोमास'मधील दुय्यम व्यक्तिरेखा

### १) सुरेश साठे

सुरेश साठे ही व्यक्तिरेखा लेखकानी कादंबरीतील कथानकाला गती मिळण्यासाठी निर्माण केली आहे. कारण कादंबरीत अनेक गोष्टी सुरेश साठेमुळे घडताना दिसतात. मधुला नोकरी मिळवून देण्याचे तो वचन देतो. त्यामुळे मधु आपले शेत दगडू शेठला दोन लाखाला करारखरेदी देऊन सुरेश

साठेला एक लाख रुपये देतो. पण तो फसला जातो. यामुळे कथानकाला गती बरोबरच कलाटणी मिळत जाते. सुरेश साठेचे कादंबरीत आगमन होते आणि एकनाथचा संसार घसरतो.

मालपाणी आमदार आपल्या ओळखीचा आहे. त्याचा पी.ए. मित्र आहे. असे सांगून तो मधुकडून नोकरी मिळवून देण्यासाठी एक लाख रुपये घेऊन जातो. पण तो काही नोकरी मिळवून देत नाही आणि पैसे पण परत मिळत नाहीत. एकनाथचे शेत मात्र दगडू महाकाळाकडेच राहते. सुरेश साठे नोकरी मिळवून देऊ शकत नाही. म्हणून तो नंतर मधुला भेटायलाही येत नाही. त्याचा येण्या-जाण्याचा रस्ता ही तो मधुला घाबरून बदलतो. तेव्हा त्याचा पत्ता शोधून एकनाथ एक-दोनदा लोणारलाही जाऊन येतो. पण तो काही भेटत नाही.

तेव्हा गावातील लोक सांगतात सुरेश साठे एका जागी सापडणार नाही. तो घाणमोडी, सावरगाव, चिखली, खामगाव अशा गावात जातो अशी माहिती देतात तेव्हा एकनाथ गावात जाऊन येणाऱ्या जाणाऱ्या मोटरसायकली पाहू लागतो. तेव्हा त्याला सुरेश साठेची मोटारसायकल येताना दिसते . तसे तो आडवा झाला आणि एकनाथने सुरेशच्या गळ्यात हात घातला. तसा तो घाबरून भलतच गंभीर झाला आणि म्हणाला, मी पण मधुच्या नोकरीसाठी खूपच प्रयत्न केले. असे वाटते, त्याची जबाबदारी का घेतली. मधुपण भेटला होता. असे सांगत आपल्यावर जबाबदारी न घेता, हजारो बेकारांना फसवून आमदाराचा पी.ए. उत्तम ठोकरे फरार झाला असे सांगतो. नंतर भेटतो म्हणून सुरेश साठे लोणार वाटेने जातो. नंतर काही भेटत नाही.

एकनाथला एके दिवशी संध्याकाळी नथ्थू मोगल भेटतो आणि सांगतो की, तुम्हाला फसविणाऱ्या सुरेश साठेचा परवाच्या दिवशी अपघात झाला. मोहाडीतून तो लोणारकडे चालला होता. तर शेणगावजवळ त्याची मोटरसायकल घसरली आणि तो त्याच जागी खलास झाला.

अशाप्रकारे सुरेश साठे ही व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली आहे. वाईट प्रवृत्तीचा शेवट वाईटच होतो हे स्पष्ट होते.

## २) बनुबा महाराज

कादंबरीच्या कथानकाला बाधा न आणता लेखकानी ग्रामीण परिसरातील अंधश्रद्धा व त्यावर विश्वास ठेवून फसत जाणाऱ्या युवकांचे चित्रण मांत्रिक बनुबाची व्यक्तिरेखा निर्माण करून त्याआधारे दाखविली आहे. या कादंबरीतील मधु हा सुशिक्षित तरुण असून त्याच्याबरोबर अनेक बेकार तरुण आहेत. त्यांना काहीतरी चमत्कार करून संपत्ती मिळवायची असते. त्या सोनेरी टोळीला एखाद्या मांत्रिकाची जोड दिली तर ते अधिक प्रभावी होऊ शकेल म्हणून लेखकानी मुद्दामहूनच या मांत्रिक बनुबाची व्यक्तिरेखा निर्माण केली आहे. सोनेरी टोळीला मार्गदर्शन करण्यासाठी त्याचा उपयोग लेखकाने चांगल्या पद्धतीने करून घेतला आहे.

मधुची सोनेरी टोळी गुप्तधनाचा शोध घेण्यासाठी तयारी करते सर्व लागणारे साहित्यही गोळा करतो. फक्त अवकाश बनुबा महाराज येण्याचाच. तो आल्यानंतर सर्वजण तयारीला लागतात आणि बनुबा महाराज सोनेरी टोळीला गुप्तधन मिळवून देण्यासाठी अनेक वस्तू हत्यारे घेऊन सोनेरी टोळीसह सोमनवाड्याच्या शीवेवर येतो. तिथे पूजा करतो. आणि गुप्तधन मिळवून देतो असे सांगतो. तेव्हा सोनेरी टोळी जमीन खोदायला लागते. हिंमत धरून खोदत चला असे बनुबा सांगतो. पण काहीच हाती लागत नसते. फक्त त्यांना मानवी सापळा व कवटी सापडते. तेव्हा दिलीप पवार घाबरतो आणि खाली पडतो. तेव्हा बनुबा अपशकुन झाला आता काही खरं नाही. असे काहीतरी कारण सांगतो व आपली बाजू सुरक्षित करतो. परत सर्व तयारी करा आणि मला बोलवा असे सांगतो आणि निघून जातो. म्हणजेच आजही ग्रामीण भागात असे अनेक बनुबा आहेत. हे मान्यच करावे लागते. ग्रामीण भागातील अशा अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि तेथील लोकांचे अज्ञान

स्पष्ट करण्यासाठी या कादंबरीत लेखकाने बनुबा या व्यक्तिरेखेची निर्मिती करून त्याचा योग्य उपयोग करून घेतला आहे.

## ३) दिलीप पवार

दिलीप पवार हा मधुसारखाच सुशिक्षित पण नोकरी नसल्याने बेकार तरुण असतो. तो एक दिवस मधुच्या सोनेरी टोळीसोबत जातो. तो सोनेरी टोळीत का जातो याविषयी लेखक लिहितो, ''त्याच्या मनात विचार येत होते: आपण शिकलो. बी.एड्. झालो. अन् हे काय आपल्या नशिबात आलं? शेवलीच्या विनाअनुदान शाळेवर आपण तीन वर्षापासून फुकटात हमाल्या केल्या. आता ग्रँट आली तर संस्थेवाले एक लाख डोनेशन मागून राहिले. अन् आपल्याजवळ तर काहीच पैसे नाहीत. शेती नाही वाडी नाही. विधवा मायने मजुरी करून, काही कामंधामं करून शिकवलं. आता डोनेशनसाठी काय विकावं? राहती आठ पत्र्याची जागा आहे. पण तिचे वीस हजारही येणार नाहीत. म्हणून मधुच्या या टोळीत सामील झालो. ''[१८] जेव्हा प्रत्यक्ष गुप्तधनाचा शोध चालू होतो. तेव्हा मात्र दिलीप पवार घाबरत असतो. आणि तशातच जमीन खोदताना त्याला काहीतरी पांढरे चांदीसारखे दिसते. तो ओरडून सर्वांना एकत्र बोलवतो आणि त्या पांढऱ्या वस्तूला जोरात ओढू लागतो. तर त्याला काही कळायच्या आतच एक मानवी सापळा त्याच्या अंगावर पडतो. सापळ्याची कवटी त्याच्या कपाळावर पडते तेव्हा तो पळायला जातो पण तिथेच पाय अडकून दगडावर पडतो आणि बेशुद्ध होतो. बनुबा त्याच्या तोडावर पाणी मारल्यानंतर दिलीप पवार सापळा... सापळा... भूत... भूत... असे ओरडतो व शुद्धीवर येतो. पण तो कोणालाही ओळखत नाही. त्याच्या डोक्यावर परिणाम होतो हे सिद्ध होते. कारण त्याची आई मधुच्या घरी येऊन जोरजोराने रडू लागते. आपला चांगला मुलगा हातातून कसा गेला ते सांगू लागते. म्हणजेच दिलीप पवार अखेर वेडा होतो.

## ४) दिनकर दाभाडे

दिनकर दाभाडे ही व्यक्तिरेखा लेखकाने समाजातील तरुणांची काय अवस्था आहे हे सांगण्यासाठी निर्माण केली आहे. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून आपणास आपली शैक्षणिक पद्धत कशी चुकीची आहे ते समजते. ही शिक्षण पद्धती जीवन जगत असताना कशी उपयोगी पडत नाही. अशा पद्धतीने शिक्षण घेऊन ही नोकरी मिळत नाही. दिनकर दाभाडे हा एम.ए. ला राज्यशास्त्र हा विषय घेऊन प्रथमश्रेणी मिळवतो. पण त्याला कोठेच नोकरी मिळत नाही. तर उलट तो गावातील उडाणटप्पू मुलांच्या सोबत चोऱ्या करतो किंवा बँड पार्टीत बिगुल वाजवितो. ते पण 'आठवी-नववी शिकलेल्या नवरदेव-नवरीच्या वरातीपुढे.' ही समाजव्यवस्था किती भयानक आहे हे दाखविण्यासाठीच लेखक ही व्यक्तिरेखा निर्माण करतो.

## ५) ममता वारे

ममता वारे ही सांजोळात एकनाथच्या शेजारी राहणारी प्राथमिक शिक्षिका असते. तिचा पती दत्ता वारे ग्रामसेवक असतो. हे कुटुंब एकनाथच्या घराजवळच राहत असते. एकनाथच्या घरात काही अडचणी निर्माण झाल्या तर त्यांना मदत करत असते. अलका व ममता वारे यांची चांगली मैत्री असते. त्यामुळे अलका नेहमी ममता वारेकडे जात असते. या कलाकृतीत ममता वारे व दत्ता वारे या दोन व्यक्तिरेखा अलका व एकनाथ यांना मदत करताना दिसतात. अलका जोपर्यंत सांजोळात होती. तोपर्यंतच ममता वारे ह्या व्यक्तिरेखेचे अस्तित्व जाणवते. नंतर जाणवत नाही. म्हणजेच या दोन व्यक्तिरेखा लेखकाने जाणीवपूर्वक निर्माण केल्या आहेत असे वाटते. तरीही ममता वारे ही व्यक्तिरेखा आपले वेगळेपण सिद्ध करते.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

## ६) मुक्ता

मुक्ता ही एकनाथच्या मामाची मुलगी असते. लहान पणापासूनच तिला असे वाटत असते की आपले लग्न एकनाथशी होणार आहे. पण एकनाथ सुशिक्षित असल्याने तो त्या अशिक्षित मुक्ताशी विवाह करू शकत नाही. तेव्हा तिचे लग्न एका पाच एकर शेती असणाऱ्या मुलाशी होते आणि तो दारुडा असल्याने मुक्ता त्याच्या संसारात चिपाड होते आणि इतरांकडे तिला मजुरीने जाऊन संसार चालवावा लागतो. अशी ही व्यक्तिरेखा या कलाकृतीत येते.

## ७) जया

'बारोमास' मधील जया ही व्यक्तिरेखा अलकाची बहीण म्हणून आली आहे. तिचा उपयोग लेखकाने ग्रामीण भाग व शहर यांची तुलना करताना चांगल्या पद्धतीने करून घेतले आहे. कारण एकनाथ जेव्हा मोहाडीला जातो. तेव्हा जया बऱ्याच गोष्टी एकनाथला सांगत असते. काही वेळा तर ती त्याला मॅनर्स नाहीत असे म्हणते. एकनाथ सकाळी लवकर उठत नाही, तेव्हा ती म्हणते, ''नाही ग. उठले नाहीत अजून. खेड्यातल्या आळशी लोकांना लवकर उठायची सवय नसते...''[११] लेखकाने जया ही व्यक्तिरेखा निर्माण करून योग्य ते औचित्य साधले आहे.

## ८) दगडू शेठ

या कलाकृतीत दगडू शेठ हा सावकार म्हणून येतो. तो एकनाथचा कल्याणीचा मळा करारखरेदी करून घेतो व मधुला नोकरीसाठी दोन लाख रुपये देतो. पण मधुला नोकरी मिळत नाही. तेव्हा सुभानराव त्याच्याकडे जातात व एक लाख रुपये घेऊन अर्धा मळा दे अशी विनंती करतात. पण तो देत नाही. मोठमोठी हात्ती मातीत घातलेला दगडूशेठ सुभानरावांना चिलटासारखा झिडकारतो व कल्याणीचा मळा परत देत नाही. तर समाजातील सावकारी फास ग्रामीण शेतकऱ्यांना कसा आवळला जातो हे या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होते.

## ९) कांबळे तलाठी आणि बळीराम

कांबळे तलाठी आणि बळीराम या दोन व्यक्तिरेखा समाजातील शेतकरी व तलाठी यांच्यातील संबंध दर्शवितात. कांबळे हा सांजोळचा तलाठी असतो तर बळीराम हा एकनाथचा मामा असतो. एकनाथ मुक्ताशी विवाह करत नाही म्हणून तो एकनाथच्या घराकडे जात नाही आणि मधुकडून तो काम करून घेऊ शकत नाही. तेव्हा त्याला इतरांकडून कामे करून घ्यावी लागतात. कांबळे तलाठी हा समाजातील अनेक ग्रामीण तलाठ्यांचे प्रतिनिधित्व करताना दिसतो. आज अशा स्वरूपाचे अनेक तलाठी आपणास ग्रामीण भागात दिसतात.

बळीरामला कर्ज काढण्यासाठी सातबारा हवा असतो पण अनेक चकरा मारल्या तरीही तो मिळत नाही. पण जेव्हा पन्नास रुपये तो तलाठ्याला देतो तेव्हा त्याला सातबारा मिळतो. तो घेऊन बळीराम कपाळाला लावतो. पण डोळ्यांपुढे मात्र पन्नास रुपयाची नोट सारखी दिसत असते. अशा प्रकारे तलाठी व शेतकरी यांचे चित्रण या कादंबरीत येते. तर दुसऱ्या बाजूला तलाठी शेतकऱ्यांची कशी पिळवणूक करतो, भ्रष्टाचार करतो हे देखील लेखक दाखविताना दिसतो.

## 'बारोमास'मधील इतर व्यक्तिरेखा

'बारोमास' या कादंबरीत इतर काही व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केल्या आहेत. त्यांचा आढावा घेताना आपणास प्रथम एकनाथच्या घरचा घरगडी खंड्या भेटतो. हा खंड्या गडी थोडा काल्पनिकच वाटतो. एकनाथच्या घरात खूप मोठी सुबत्ता नांदत नाही. त्याच्या घरात दारिद्र्य असतानासुद्धा घरगडी असू शकेल काय? हा प्रश्न निर्माण होतो. शिवाय एकनाथ व मधू हे घरातच असताना जनावरांची व्यवस्था ते करू शकले असते पण तसे लेखकाने दाखविले नाही. जरी खंड्या गडी काल्पनिक वाटत असला तरीसुद्धा कथानकाच्या वास्तवाला धक्का पोचत नाही. तसेच दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे मुगुटराव हा नेहमी एकनाथच्या घरात येऊन टी.व्ही. पहात असतो. मुगुटरावला

दिवसातून एकदा तरी टी.व्ही.तल्या बायका पाहिल्या शिवाय करमत नाही. एवढी सवय त्याला टी.व्ही. पाहण्याची लागलेली असते. तसेच समिंदरा आजीचा नातू रमेश काकडे ही व्यक्तिरेखा आज समाजातील बेकायदेशीररीत्या प्रवाशी वाहतूक करणाऱ्या जीपगाड्यावर प्रकाश टाकते. रमेश आपली शेती विकून जीप घेतो व गावच्या बसस्थानकावर कसे ओरडत फिरतो याचे चित्रण आले आहे. तर नरूभाऊसारखा आधुनिक शेतकरी स्वत:च्या पैशानी शेतकऱ्यांसाठी मेळावे घेत असतो. पण शेतीचा फटका बसल्यानंतर कसा अडचणीत सापडतो. आणि आत्महत्या करून सुद्धा प्रश्न सुटत नाहीत असे म्हणतो, त्याविषयी लेखक लिहितो, ''आत्महत्या करून समस्या संपत नाहीत. उलट आणखी वाढतात. घराच्या, बायका-मुलांच्या. त्यांना वैराण वाळवंटात लोटून जाण्याचं काय कारण? ते तर पापच. शेती काय नसली तर नसली?''[१९]

तसेच सहा वर्षापूर्वी डी.एड्. झालेला नरेश चांदणे आजही बेकारच दिसतो. त्याला नोकरी नाही. अशाच बेकारांची एक सोनेरी टोळी या कादंबरीत उदयाला येते. आणि वेगवेगळे प्रश्न निर्माण करते. याचे चित्रण या कादंबरीत येते. त्याचबरोबर या कलाकृतीत प्राण्यांचाही समावेश करण्यात आला आहे. सुभानराव व कांगरी कुत्री यांच्यातील काही महत्त्वपूर्ण प्रसंग येतात तर शेवंतामाय व मंगळ्यावासरू यांचे संबंधही लेखक दाखवितो. चंद्री मांजराचाही लेखकांनी योग्य ठिकाणी उपयोग करून घेतला आहे. आणि पक्षांची अवहेलनाही मांडली आहे. पशुपक्षी प्राणीविश्व हे ग्रामीण माणसाच्या मनाचे अविभाज्य असे अंग आहे. याचेही चित्रण कादंबरीत येते.

## समारोप

अशा पद्धतीने सदानंद देशमुख यांनी आपल्या 'बारोमास' या कादंबरीत विविध व्यक्तिरेखा निर्माण केल्या आहेत. या व्यक्तिरेखा कादंबरीच्या कथानकाला मदतच करताना दिसतात. कोठेही कादंबरीच्या आशयाला बाधा आणत नाहीत म्हणून सदानंद देशमुख अशा व्यक्तिरेखा निर्माण करण्यात व कादंबरीत त्यांचे योग्य ठिकाणी उपयोजन करण्यात यशस्वी ठरले आहेत.

## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | देशमुख सदानंद | 'बारोमास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३० आवृत्ती पहिली २००२. पृष्ठ- ९५ |
| २. | तत्रैव | पृष्ठ- ६९ |
| ३. | तत्रैव | पृष्ठ- १५८ |
| ४. | तत्रैव | पृष्ठ- ३४०-३४१ |
| ५. | तत्रैव | पृष्ठ- १३६ |
| ६. | तत्रैव | पृष्ठ- ७ |
| ७. | तत्रैव | पृष्ठ- १४ |
| ८. | तत्रैव | पृष्ठ- १६१ |
| ९. | तत्रैव | पृष्ठ- १६३ |
| १०. | तत्रैव | पृष्ठ- २५६ |
| ११. | तत्रैव | पृष्ठ- २ |
| १२. | तत्रैव | पृष्ठ- ५ |
| १३. | तत्रैव | पृष्ठ- १४७ |
| १४. | तत्रैव | पृष्ठ- ३१८ |
| १५. | तत्रैव | पृष्ठ- ५३ |
| १६. | तत्रैव | पृष्ठ - ८८ |
| १७. | तत्रैव | पृष्ठ-२९२ |
| १८. | तत्रैव | पृष्ठ-३३ |
| १९. | तत्रैव | पृष्ठ-११९ |
| २०. | तत्रैव | पृष्ठ-३२७ |